# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price Rs. 3/-

# संवाद

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥

॥ स्वयमेव मृगेंद्रता ॥

Vol.-2 | Issue - 02 | ऑगस्ट २००९ | August 2009

## संपादकीय

सभासद बंधूंनो,

अहमदनगर येथील दिनांक २२ जुलैच्या २००९ च्या स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशनच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आधी दोनच दिवस म्हणजे दि. २० जुलैला एक अत्यंत धक्कादायक घटना घडली. आपणा सर्वांना पितृतुल्य असलेले आपले ज्येष्ठ सहकारी व मार्गदर्शक तसेच आपल्या असो.चे १९८९ पासून सलग सहा वर्षे अध्यक्ष म्हणून व १९९३ ते ९६ फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून यशस्वीपणे धुरा वाहणारे आदरणीय श्री.भास्कर रामचंद्र गद्रे यांचे पुण्यामध्ये आपल्या राहत्या घरी वयाच्या ८९ व्या वर्षी दु:खद देहावसान झाले. भावपूर्ण अंत:करणाने आम्ही मा.भास्करराव गद्रे यांच्या पवित्र स्मृतीस प्रारंभीच आदरांजली वाहतो. त्यांच्याविषयी श्री.बी.जी.दांडेकर यांनी इंग्रजीत लिहिलेला आणि श्री.वि.सहस्रबुद्धे यांनी मराठीत लिहिलेला असे दोन विशेष श्रद्धांजली लेख या अंकात अन्यत्र छापलेले आहेत.

दि.२२ जुलै २००९. स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशनच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा हा दिवस. संपूर्ण महाराष्ट्र आणि गोवा येथून नगर येथे आलेले आमचे शेकडो सभासद आळंदीहून पंढरपूरला चाललेले वारकरी वारवरी गांव आल्यावर पंढरपूरला पळत जातात, तसे आमचे सभासद बस स्टॉपहून उतरल्या उतरल्या घाईने सभा मंडपाच्या रस्त्याच्या दिशेने चालले होते. स्टँडवरच अनेक ठिकाणाहून आलेले सभासद एकमेकांना रस्त्यातच गळामिठी करत भेटत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक आगळावेगळा आनंद उत्साह ओसंडत होता. असे म्हणतात की, महाराष्ट्रात लोकांच्या दृष्टीने अमावस्या चांगली नसते, पण मद्रासकडील मंडळी हा शुभदिवस मानतात. त्या दिवशी सोने खरेदी करतात. आमच्या सभासदांच्या दृष्टीनेही हा दिवस सोन्याचाच आहे. कारण या दिवशी संतोषाने, आनंदाने व उत्साहाने प्रत्येक सभासदाचे मन भरलेले असते.

यावर्षी आमच्या संतोषाचे कारण होते ते नगर युनिटचे सेक्रेटरी श्री. गुजराथी आणि त्यांचे सहकारी सर्वश्री. बलदोटा, धर्माधिकारी, डावरे, प्रल्हाद देशपांडे, धावटे आणि त्यांचे अन्य सहकारी. पाहुण्यांच्या आगत स्वागतात, आदरातिथ्यात काही कमी पडायला नको म्हणून त्यांची धावपळ दिसून येत होती. हा उत्साह-सोहळा आनंदात साजरा व्हावा म्हणून ही मंडळी गेल्या २/३ महिन्यापासून कामाला लागलेली होती. त्यांचा उत्साह, आनंद त्यांच्या चेहऱ्यावरही दिसत होता.

वार्षिक सर्वसाधारण सभा नगरसारख्या ठिकाणी घडवून आणणे ही क्षुल्लक घटना नाही. दुर्दम्य आत्मविश्वासाच्या बळावर अहमदनगरवासियांना हा मान मिळावा; पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक ह्यांच्याही पंक्तीत आपण जाऊन बसावे ही श्री. गुजराथी व त्यांच्या सहकाऱ्यांची मनापासूनची इच्छा. हे साध्य करण्यासाठी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना दिलेली प्रेरणा व त्यांच्या सहकार्यातून घडवून आणलेले हे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. एखाद्या आडगावातील विद्यार्थी जसा एस.एस.सी.बोर्डात पहिला येतो तसे नगरवासीय सहकारी आता पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक ह्यांच्या पंक्तीत जाऊन बसले आहेत.

ह्या सभेतील सर्वश्री गोखले, दांडेकर यांची भाषणे व सर्वश्री करमरकर, देसाई आदी सभासदांनी मनमोकळेपणाने मांडलेले आपले विचार सभासदांना नवी दिशा देणारे होते.

या सर्वसाधारण सभेच्या प्रसंगी उपस्थितांना मिळालेली उपयुक्त पुस्तिका, सर्व सहकाऱ्यांकडून मिळालेले प्रेम, आनंद, समाधान यासाठी आम्ही नगरवासियांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. नगर युनिटकडून यापुढेदेखील मोठाली सामाजिक कार्ये घडोत आणि त्यापासून इतर युनिटस्ना प्रेरणा मिळो हीच आमची सदिच्छा.

अधिवेशनाच्या निमित्ताने होणाऱ्या भेटीगाठी नवीन कार्याला प्रेरणा देणाऱ्या असतात. स्वत:हून आलेले असंख्य सभासद अध्यक्षांशी व इतर मान्यवरांशी प्रत्यक्ष बोलतात. सभेत आपले विचार मुक्तपणे मांडतात. सभासदांचे विचारस्वातंत्र्य जपले जाते. तसेच असोसिएशनच्या कार्याला नवी दिशा मिळते. ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे हेच महत्त्वाचे फलित मानावे लागेल.

- शरद शिंगवेकर

(Ref : Corporate Centre e-Circular No.CDO/P&HRD-IR/33/2009-10 Dated 14-08-2009 )

**Table-1 RATES OF DEARNESS RELIEF PAYABLE TO PENSIONERS Annexure-I**
**WHO HAVE RETIRED (A) PRIOR TO 1-11-1987 and (B) BETWEEN 1-11-1987 & 31-10-1993**

| Sr. No. | Basic Pension + F.D.R. | Dearness Relief for the months from **August 2009 to January 2010** (Average Index - 3454) (Slabs - 713) |
|---|---|---|
| i) | Upto Rs.1,250=00 | 477.71 % of aggregate of Basic Pension & F.D.R. |
| ii) | Rs.1,251=00 to Rs.2,000=00 | Rs.5,971=37 + 392.15 % of aggregate of Basic Pension & F.D.R. in excess of Rs.1,250=00 |
| iii) | Rs.2001=00 to Rs.2,130=00 | Rs.8,912=49 + 235.29 % of aggregate of Basic Pension & F.D.R. in excess of Rs.2,000=00 |
| iv) | Above Rs.2,130=00 | Rs.9,218=36 + 121.21 % of aggregate of Basic Pension & F.D.R. in excess of Rs.2,130=00 |

**Table-2 DEARNESS RELIEF PAYABLE TO PENSIONERS**
**WHO HAVE RETIRED ON OR AFTER 1-11-1993 UPTO 31-10-2002**

| Sr. No. | Basic Pension | Dearness Relief for the months from **August 2009 to January 2010** (Average Index - 3454) (Slabs - 576) |
|---|---|---|
| i) | Upto Rs.2,400=00 | 201.60 % of Basic Pension |
| ii) | Rs.2,401=00 to Rs.3,850=00 | Rs.4,838=40 + 167.04 % of Basic Pension in excess of Rs.2,400=00 |
| iii) | Rs.3,851=00 to Rs.4,100=00 | Rs.7,260=48 + 97.92 % of Basic Pension in excess of Rs.3,850=00 |
| iv) | Above Rs.4,100=00 | Rs.7,505=28 + 51.84 % of Basic Pension in excess of Rs.4,100=00 |

**Table No.3 Dearness Relief payable to Pensioners who have retired on or after 1-11-2002**
**for the months from August 2009 to January 2010**

(Average Index - CPI - for quarter ended June 2009 :- 3454 ; and No. of Slabs - 291)

**Rate of Dearness Relief on Pension :- 52.38 % of Basic pension**

(Ignore decimals from 3rd place onwards)


**Dearness Relief payable to Family Pensioners Annexure - II**

(i) Dearness Relief for Family Pensioners in respect of pensioners who died or retired (a) before 1-11-1993 (b) on or after 1-11-1993 but before 1-4-1998 and (c) on or after 1-11-2002 will be paid as per the tables given for the pensioners in Annexure-I

(ii) The Dearness Relief of Family Pensioners in respect of pensioners who died or retired on or after 1-4-1998 but before 1-11-2002 will be as per the following table :-

| Sr.No. | Basic Family Pension | Dearness Relief for the months from **August 2009 to January 2010** (Average Index - 3454) (Slabs - 442) |
|---|---|---|
| i) | Upto Rs.3,550=00 | 106=08 % |
| ii) | Rs. 3,551=00 to Rs. 5,650=00 | Rs. 3,765=84 + 88.40 % of Basic Family Pension in excess of Rs. 3,550=00 |
| iii) | Rs. 5,651=00 to Rs. 6,010=00 | Rs. 5,622=24 + 53.04 % of Basic Family Pension in excess of Rs.5,650=00 |
| iv) | Above Rs. 6,010=00 | Rs. 5,813=18 + 26.52 % of Basic Family Pension in excess of Rs. 6,010=00 |

# Blessed Benevolent Banker
# Late Shri. Bhaskar Ramchandra Gadre



I deeply regret to place on record that former President of our Association and also former President of our Federation Shri.Bhaskar Ramchandra Gadre passed away peacefully at Pune on the 20th July 2009. He was 89 years old. This is a great loss to our active organization and all of us will have to be more active and united for achieving our remaining goals. I have been privileged to be associated with him since 1952 while working at Local Head Office, Mumbai. It was also my fortune to receive his blessings.

Shri. Gadre was born on 13th August 1920 at Satara and there he completed his matriculation. Subsequently, he joined S.P.College, Pune for graduation and post-graduation (M.Sc - Mathetics in 1942 which he completed with Distinction). During his career he had an opportunity to get guidance from renowned scholars viz. Wrangler Mahajani, Wrangler Kerkar, Wrangler Chandratreya etc. and was very proud to follow their principles for success. Afterwards he appeared for special examination of the then 'Bombay Province Home Services' and served at Secretariat (Home Department) for two years. Subsequently, in 1943 at the age of 23 years he joined the then 'Imperial Bank of India' as Probationary Assistant. He was posted at important branches viz. Mumbai, Pune, Nagpur, Secunderabad, Deolali, Wardha, Chandrapur, Baroda, Raipur, Indore, Bhllai, Calcutta (Foreign Exchange) and foreign offices at Colombo, London and New York. He successfully completed all the assignments with different challenges and after 34 years of service at his credit he retired as Chief General Manager of New York in 1977. During his short visits to LHO I used to hear about his assignments. In early 1960 the Portuguese territory of Goa was annexed to India and the Government of India was in search of capable person to sort out financial problems surfacing in Goa. He was posted there and was Custodian of Banco National Altramarino and sorted out all the problems. During 1963 to 1965 he was General Manager of Hindistan Commercial Bank and in 1965 after Pakistan war he worked as Deputy Controller of Enemy Property. All such important responsibilities devolved on his shoulders because of his expertise and experiences. During London stay he arranged the gathering of the adherents and admirers of the R.S.S. and this was attended by the then Prime Minister of England Mrs. Margaret Thatcher.

His active life was not confined to the Bank alone. His benevolence got manifested in his dealings with every man he met. This is how he built long relationship with one and all in our Association and Federation also. While releasing our Souvenir and addressing special gathering at the time of celebrating two dacade special function he was very happy to see old retirees and expressed that apart from the benefits that pensioners have received there is different dimention which he experienced in the working of the Association that there is only one category of membership and they have forgotten their ranks and positions and meet each other as equals. Another aspect which is very very revealing is the participation of families of pensioners. He insusted that all the pensioners should meet their fellow pensioners at their residences and ascertain their problems. With such a social zeal and ideas he was instrumental for getting sanction of "State Bank of India Retired Employees' Medical Benefit Scheme" with limit of Rs.2 lacs in 1996 when Shri. P.G.Kakodkar was the Chairman of our Bank. He had also an opportunity to meet distinguished personalities like Mahatma Gandhi, Shri.J.krishnamurthy, Shri.Chandraswami, Queen of England (Her Majesty Elizabeth) and leaders from Soviet Union. He was follower of 'Geeta' from his childhood and conducted short courses at different places. Our Association honoured him with 'Gold Medal' in the memory of Late Shri. L.N.Pabalkar in 1999 for selfless participation in Association activities and valuable guidance. He was humble beyond anybody's expectations. He carried himself with humility and dignity and I will cherish recollecting of working under his guidance and goodwill for ever. May God rest his soul in peace!!

***- B.G.Dandekar***
Advisor to the Federation and
former President of the Federation



Shri. V.M. Gokhale,
President, and Shri.B.G.Dandekar, Advisor to the Federation lighting the Traditional Lamp while inaugurating Annual General Meeting on 22nd July '09 at Ahmednagar



Shri.Chandrakant Gujrathi welcoming the Office bearers of the Association sitting on the dias (L to R) Sarvashri R.N.Lalingkar, Secretary, V.P.Bhave, Vice President, P.M.Narkar, Vice President, B.G.Dandekar, Advisor to Federation V.M.Gokhale, President, S.G.Desai, Vice President, S.B.Gokhale, Joint Secretary(Mumbai) Bharat Gupte, Joint Secretary (Pune) and S.P.Barve, Treasurer



Shri. V.D.Deshpande,
Asstt. Gen.Manager (PPG Dept) Corporate centre, being welcomed by Shri.V.M.Gokhale, President at Annual General Meeting dt. 22nd July 2009 at Ahmednagar

# ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

आपल्या असोसिएशनची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अहमदनगर येथील 'आम्रपाली' मंगल कार्यालयाच्या प्रशस्त मंडपात दि.२२ जुलै २००९ रोजी मोठ्या उत्साहामधे संपन्न झाली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्राच्या सर्व विभागातून व गोमंतकातून सभासद, सहसभासद व फॅमिली पेन्शनर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूण उपस्थिती ६५० च्या आसपास होती.

आपल्या कार्यकारी मंडळाने ठरविल्याप्रमाणे या वर्षी वार्षिकसभा आयोजनाची मोठी जबाबदारी अहमदनगर युनीटने स्विकारली होती. व ती युनीटचे सेक्रेटरी श्री. चंद्रकांत गुजराथी यांच्या नेतृत्वाखालील त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी समर्थपणे पेलली हे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते. रहाण्या-जेवणाची उत्कृष्ट व्यवस्था केल्याने सर्व उपस्थित सभासद खूष होते. तसेच जुने सहकारी मित्र भेटल्यामुळे सभासदांच्या गतस्मृतींनाही उजाळा मिळाला. सभेच्या आदल्या दिवशी रात्री उपस्थित सभासदांच्या करमणूकीप्रीत्यर्थ स्थानिक 'नादब्रह्म संगीतालयाच्या' कलाकारांनी मराठी नाट्यगीतें तसेच जुनी व नवी मराठी-हिंदी लोकप्रिय गीते सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. त्यामुळेही ही वार्षिक सभा संस्मरणीय ठरली.

सुरूवातीला श्री. चंद्रकांत गुजराथी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांना मंचावर पाचारण केले. त्यानंतर श्रीमती माधवी कुलकर्णी व सौ.अष्टेकर यांनी सुमधूर आवाजात ईशस्तवन सादर केले. त्याबद्दल त्यांचे आपले अध्यक्ष श्री.गोखले यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तदनंतर मंचावरील सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांचे हस्ते दीपप्रज्वलन झाल्यावर सेक्रेटरी श्री.लळिंगकर यांनी सभेच्या कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे कामकाजास सुरूवात केली.

प्रथम श्री.लळिंगकर यांनी या सभेनिमित्त ज्या व्यक्तींनी शुभसंदेश पाठवलेले होते अशा व्यक्तींची नांवे वाचून दाखवून त्यांचे असोसिएशनतर्फे हार्दिक आभार मानले. यात फेडरेशनचे उपाध्यक्ष श्री.टी.आर.राव (भुवनेश्वर सर्कल) व श्री.व्ही.के.मेहरोत्रा (लखनौ सर्कल), फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी श्री.पी.पी.एस.मूर्ती, पणजी झोनल ऑफिसमधील मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.बांदोडकर, श्री.राम चांदोरकर (औरंगाबाद), श्री.प्रमोद चाटे (पुणे), श्री.जयंत खराडकर (कल्याण), श्री.थडाणी (लंडन) व श्री.एम.एम.राजोपाध्ये (पुणे) यांचा समावेश होता.

त्यानंतर गेल्या वर्षभरात दिवंगत झालेल्या सभासदांची नांवे वाचून दाखवल्यावर सर्व उपस्थितांनी १ मिनीट उभे राहून मृत सभासदांना श्रद्धांजली वाहिली. यात प्रामुख्याने आपल्या असोसिएशनचे, तसेच फेडरेशनचे माजी अध्यक्ष श्री.भास्कर रामचंद्र गद्रे साहेबांचा समावेश आहे. ते दोनच दिवसांपूर्वी २० जुलैला दिवंगत झाले. फेडरेशनचे माजी अध्यक्ष श्री. दांडेकर व असोसिएशनचे अध्यक्ष श्री.व्ही.एम.गोखले यांनी असोसिएशनतर्फे कै.गद्रे साहेबांना श्रद्धांजली वाहिली.

या सभेत विशेष निमंत्रित श्री.व्ही.डी.देशपांडे, सहा.महा प्रबंधक, पीपीजी डिपार्टमेंट, कॉर्पोरेट सेंटर, मुंबई (ते स्टेट बँक ऑफिसर्स फेडरेशनचे जॉइंट जनरल सेक्रेटरी पण आहेत) तसेच मुंबई हेड ऑफिसमधील पीपीजी डिपार्टमेंटचे स.म.प्र. श्री. केशव ठावकर यांचा मा.अध्यक्षांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला. तसेच सभेस निमंत्रित स्टेट बँक ऑफिसर्स असोसिएशनचे पदाधिकारी सर्वश्री पी.व्ही.दिगुळे, वाघमारे, एन.बी.कुलकर्णी व अहमदनगर मुख्य शाखेचे स.म.प्र. डॉ.भाऊसाहेब पवार, तसेच स्टाफ युनियनचे स्थानिक पदाधिकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

श्री.व्ही.डी,देशपांडे यांना मा.अध्यक्षांनी उपस्थित सभासदांना संबोधित करण्याची विनंती केली. आपल्या भाषणात प्रथम श्री.व्ही.डी.देशपांडे यांनी त्यांच्या परिचयाच्या दिवंगत निवृत्त सहकाऱ्यांना श्रद्धांजली वाहिल्यावर बँकेने त्यांच्यावर सध्या पेन्शनर्सच्या तक्रारी व अडचणी सोडविण्याची जी जबाबदारी दिलेली आहे त्यासंबंधीची माहिती दिली. शक्यतो एक महिन्यात तक्रारींचे निरसन व्हावे असा त्यांचा प्रयत्न असतो. कांही गुंतागुंतीच्या प्रकरणांचा निपटारा होण्यास मात्र जास्त वेळ लागतो असे ते म्हणाले. बँकेने पेन्शनर्ससाठी चालू केलेले त्रैमासिक 'सेकंड इनिंग' हे सर्व पेन्शनर्सना मिळावे याद्दष्टीने पेन्शनर्स असोसिएशनची मदत घेण्याचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे आपल्या भाषणात त्यांनी बँकेने पेन्शनर्सना त्यांनी नोकरी काळात घरासाठी जास्त दराने (कमर्शिअल व्याज दराने) घेतलेल्या कर्जाचे रूपांतर कन्सेशनल हाऊसिंग लोनमधे (८ टक्के दराने) करण्यासंबंधीचे सर्क्युलर काढल्याची माहिती दिली. त्याच बरोबर निवृत्ती नंतर मिळणाऱ्या सर्व गोष्टींची सविस्तर माहिती (उदा. प्रा.फंड, ग्रॅच्युइटी, पेन्शन कॅल्क्युलेशन, मेडिकल बेनिफिट स्कीम इ. माहिती) असलेले पुस्तक बँक पी.पी.जी. डिपार्टमेंटमध्ये काम करणाऱ्या सर्वांसाठी काढणार आहे. त्याची सी.डी. पेन्शनर्सना उपलब्ध करून देण्याचा विचार चालू असल्याची माहिती दिली. बँकेचे वरिष्ठ अधिकारी व पेन्शनर्स फेडरेशनचे पदाधिकारी यांच्यातील स्ट्रक्चर्ड/इनफॉर्मल मीटिंगज् दरवर्षी घेऊन तसेच ऑफिसर्स फेडरेशन व पेन्शनर्स फेडरेशन यांच्यात नियमित विचारविनिमय करून पेन्शनर्सच्या प्रश्नांची तड लावण्याचा प्रयत्न त्यांच्या वैयक्तिक स्तरावर करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

त्यानंतर मुंबई सर्कल ऑफिसर्स असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी श्री.दिगुळे यांनी सभेला संबोधित केले. त्यांनी आपल्या



Shri. B.G.Dandekar,
Advisor to the Federation,
speaking at the
Annual General Meeting
dt. 22nd July 2009




Shri. V. D. Deshpande,
AGM (PPG) Corporate Centre,
Mumbai, speaking at the
Annual General Meeting
dt. 22nd July 2009



A section of the
audiance at the
Annual General Meeting
dt. 22nd July 2009
at Ahmednagar

भाषणात ऑफिसर्स असोसिएशन व पेन्शनर्स असोसिएशन यांच्यातील सुसंवादासंबंधीचा उल्लेख करून पेन्शनर्सच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याचे आश्वासन देऊन या अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या.

श्री.व्ही.एम.गोखले यांनी श्री.दिगुळे यांच्या भाषणावर प्रतिक्रिया व्यक्त करतांना असे सांगितले कीं, एप्रिल २००६ च्या संपामुळे जरी सध्या नोकरीत असलेल्या स्टाफला काहीही फायदा नसतांना व संपकाळातील वेतन मिळणार नाही हे माहीत असूनही केवळ निवृत्ती नंतरच्या मिळणाऱ्या लाभात सुधारणा होण्यासाठी ते सर्वजण संपावर गेले होते, याबद्दल त्यांचे आभार मानलेच पाहिजेत. पण संपामुळे फक्त १ नोव्हेंबर २००२ नंतर निवृत्त होणाऱ्यांनाच त्याचा कांही प्रमाणात फायदा झाला. पण १-११-२००२ पूर्वीच्या निवृत्तीवेतन धारकांना कांहीही वाढ वा फायदा झालेला नाही. विशेषत: १९८७ नंतर निवृत्त झालेल्यांना केव्हा वाढ मिळणार? याचा विचार ऑफिसर्स व अॅवॉर्ड स्टाफ फेडरेशनने वाटाघाटी करतांना ध्यानात ठेवला पाहिजे ही आमची अपेक्षा आहे. तसेच गतवर्षी मान्य केलेल्या इंडस्ट्रि-लेव्हल फॅमिली पेंशनमुळे तर फॅमिली पेन्शनधारकांपैकी फार थोड्यांनाच त्याचा लाभ मिळाला. बऱ्याच फॅमिली पेन्शनर्सना कांहीही वाढ मिळाली नाही. आपली मागणी सरसकट सर्व फॅमिली पेन्शनर्सना ३०% दराने फॅमिली पेन्शन मिळावे हीच असून त्यासाठी नागपूर हायकोर्टात असोसिएशनने दावा देखील दाखल केला आहे. पण 'मसल-पॉवर' वर्कींग स्टाफ फेडरेशन्सजवळ असल्याने त्यांनी याचा विचार करणे आवश्यक आहे. बँकेचे चेअरमनसुद्धा आपल्या मागण्यांबाबत सहानुभूती बाळगून आहेत. पण त्यांच्या अखत्यारीतील फॅमिली पेन्शनबाबत व मेडिकल बेनिफिट स्कीमबद्दलही त्यांनी कांहीही केलेले नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून श्री.देशपांडे व श्री.दिगुळे यांनी त्यांच्याकडे असलेल्या 'मसल-पॉवरचा' योग्य उपयोग करून पेन्शनर्सच्या प्रलंबित सर्व मागण्यांचा पाठपुरावा करावा ही विनंती आपल्या अध्यक्षांनी केली. त्यानंतर आपले सेक्रेटरी श्री.लळिंगकर यांनी श्री.व्ही.डी.देशपांडे यांना पाहिजे असलेले सर्व पेन्शनर-सदस्यांचे नाव-पत्त्याचे सर्व रेकॉर्ड सी.डी. वर उपलब्ध करून देण्याचे मान्य करून, जेणे करून सर्वांना घरपोच 'सेकंड इनिंग्ज'चे अंक बँकेला पाठवता येतील असे सांगितले.

त्यानंतर गेल्यावर्षी १ ऑगस्ट २००८ रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इंग्रजी वृत्तांत, (जो सप्टेंबर २००८ च्या संवाद मध्ये छापला असून), टाळ्यांच्या गजरात एकमताने संमत करण्यात आला. त्यानंतर, नित्यनेमाने असोसिएशनचे काम करणाऱ्या पुढील कार्यकर्त्यांचा मा.अध्यक्षांचे हस्ते हार्दिक सत्कार करण्यात आला. सर्वश्री (१) माधव बापट (जन्मदिवशी शुभेच्छाकार्ड पाठवतात ; पुणे येथील लायब्ररी चालविणारे (२) अशोक वाकचौरे; (३) अरविंद काळे; संवाद मासिकाच्या संपादक मंडळातील संपादक (४) प्रभाकर गुपचुप; (५) श्रीधर सहस्रबुद्धे; (६) क्रांतीसेन आठवले; (७) शरद शिंगवेकर; तसेच (८) सुहास बोकील - यांच्या आचार्य अत्रे यांच्यासंबंधी साहित्य, भाषणे इ. च्या संग्रहाच्या प्रदर्शनाची दखल लिम्का बुक ऑफ रेकॉर्डसने घेतल्याबद्दल; (९) श्रीकांत तरडे - एड्सविषयी जनजागृती कार्यातील बहुमोल सहभागामुळे इंटर नॅशनल गोल्ड लायन्स अॅवॉर्ड मिळाल्याबद्दल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे झोनल सब-सेंटरचे जॉइंट सेक्रेटरी श्री.अशोक पंडित यांनी केले.

त्यानंतर आपल्या संवाद मासिकातर्फे घेतलेल्या लेख स्पर्धेतील पुढील विजेत्यांना बक्षिस-वितरण मा.अध्यक्षांचे हस्ते झाले.

पुरूष विभाग -(१) श्री.य.ह.डबीर - रू.५००/-;
(२) श्री.श्रीकांत तरडे - रू.३००/-; (३) श्री.मदनलाल काबरा - रू.२००/-.
स्त्री विभाग - (१) सौ.सुचेता हातेकर - रू.५००/-;
(२) सौ.मनीषा कुलकर्णी - रू.३००/-; (३) सौ.शशी स्वामी - रू.२००/-.

त्यानंतर श्री.एस.पी.बर्वे, ट्रेझरर, यांनी असोसिएशनचे ऑडिट केलेले ३१ मार्च २००९ अखेरचे आय-व्यय पत्रक, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद सभेपुढे मंजुरीसाठी ठेवले. प्रथम त्यांनी जून ०९ च्या संवाद मासिकात छापलेल्या वरील आर्थिक पत्रकांतील छपाई करतांना झालेल्या चुका सभेच्या निदर्शनास आणून देऊन व त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून त्याची सुधारित पत्रकातील योग्य आकडेवारी सादर केली. संवाद मधील आवाहनानुसार श्री.पुरूषोत्तम तडवळकर (पुणे) व श्री.एस.डी.मेहता (सांगली) यांनी कांही खुलासे मागितले होते. त्यासंबंधीचे खुलासे श्री.बर्वे यांनी सादर केल्यावर वरील तीनही सुधारित आर्थिक पत्रके सभेने एकमताने टाळ्यांच्या गजरात मंजूर केले.

त्यानंतर सेक्रेटरी श्री.लळिंगकर यांनी कार्यकारी मंडळाचा सन २००८-०९ चा वार्षिक अहवाल, की जो संवाद मासिकाच्या जून २००९ च्या अंकात छापला आहे, सभेपुढे मंजुरीसाठी ठेवल्यावर त्यातील आझाद मैदानातील धरणे आंदोलनाचे वेळी भाषणे केलेल्या व?त्यांच्या यादीत श्री.व्ही.डी.देशपांडे, उपाध्यक्ष, स्टेट बँक ऑफिसर्स असोसएशन (मुंबई सर्कल) व ऑफिसर्स फेडरेशनचे जॉइंट जनरल सेक्रेटरी, यांचा अनवधानाने ऊल्लेख करावयाचा राहून गेला असल्याने त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणारा व त्यांचे नावाचा उल्लेख करण्यासंबंधीचा ठराव सेक्रेटरींनी मांडल्यावर त्यास सभेने मंजुरी दिली. त्याच बरोबर सभेपुढे नेहमीच्या प्रथेप्रमाणे ५ ठराव मंजूरीसाठी ठेवले. त्यापैकी आपल्या बँकेच्या कॉर्पोरेट सेंटर, लोकल हेड ऑफिस व झोनल आफिसेसमधील सर्व संबंधित




Shri. V.M.Gokhale, President speaking at Annual General Meeting dt. 22nd July 2009 at Ahmednagar




Shri. N.B. Kulkarni, officiating AGM (Admin) Z.O.Pune, being welcomed at Bank's Pensioners' Meet held at Ahmednagar on 22nd July 2009



Registration counter at the Annual General Meeting held on 22nd July 2009 at Ahmednagar

अधिकाऱ्यांचे, पेन्शनर्सच्या प्रश्नांकडे सहानुभूतीने बघून त्यांच्या सोडवणूकीतील त्यांच्या सहकार्याबद्दलचा आभार मानणारा ठराव, श्री.मोहदरकर व इतर काही सदस्यांनी विरोध केल्याने बहुमताने मंजूर केला. श्री.मोहदरकर यांचे म्हणणे होते की, आपले अजून बरेच प्रश्न प्रलंबित असल्याने व त्यांच्या निराकरणासाठी बँक कांही करत नसल्याने असा ठराव करू नये. त्यास सेक्रेटरी व अध्यक्ष यांनी खुलासा केल्यावर ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला. बाकीचे चारही ठराव याआधी मंजूर झाले.

यानंतर सभासदांच्या खुल्या चर्चेसाठी (Open Session)कांही वेळ अध्यक्षांचे परवानगीने देण्यात आला. ज्यांनी आधी परवानगी मागितली होती त्या दोन पैकी एक सदस्य श्री.मुकुंदराव करमरकर, सांगली, यांनी आपले म्हणणे सभेपुढे मांडले. त्यात त्यांनी कपूर केसमधील सुप्रीम कोर्टाचा निकाल, तसेच हैदराबाद व इतर हायकोर्टातील निकालांच्या अनुषंगाने असोसिएशनने काय करावयास पाहिजे याचा उहापोह केला. तसेच सांगली येथील आपले एक सभासद ॲडव्होकेट प्रभाकर माळगे यांच्या कोर्ट केसेसच्या विशेष अभ्यासाबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर धुळे येथील एक सदस्य श्री.साहेबराव देसाई यांनीही आपले विचार मांडले. त्यांनी जे मुद्दे मांडले त्यात, ज्यांचा स्पेशल अलाऊन्स पेन्शन कॅलक्युलेशनचेवेळी धरला नसेल त्यांनी तो धरून आपल्या केसेस बँकेकडे मंजूरीसाठी पाठवाव्यात, ज्या सभासदांना नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीमुळे नुकसान सोसावे लागते (उदा. धुळे येथील श्री.राजाराम जाधव याची केस) त्यांना असोसिएशनने शिल्लक फंडातून आर्थिक मदत करावी, म्युच्युअल वेलफेअर स्कीममधील मेडिकल कंपोनंटची रक्कम लवकर मिळण्यासाठी सूचना, आपल्या झोनल सबसेंटर येथे वैद्यकीय उपचारासाठी येणाऱ्या सभासदांची उतरण्याची सोय होण्यासाठी असोसिएशनने जागा उपलब्ध करून देण्याचा विचार करावा, वार्षिक सभेच्या कार्यक्रम पत्रिकेमधील मुद्द्यांमध्ये सभासदांना आपले विचार मांडण्यासाठी व ठराव मंजूर करण्यासाठी किमान एक तास द्यावा, तसेच कर्मचाऱ्यांच्या ९व्या द्वीपक्षीय वेज-रिव्हीजनची बोलणी चालू असतांना आपल्या प्रतिनिधींना ऑबझर्वर म्हणून बोलावण्याचा आग्रह असोसिएशनने धरावा, इत्यादी मुद्द्यांचा समावेश होता. त्यानंतर उपाध्यक्ष श्री.नारकर यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले की, आपल्यापैकी बऱ्याच सभासदांनी वयाची पासष्ठी ओलांडली असल्याने व शारीरिक व आर्थिक क्षमता कमी झाली असल्या कारणाने त्यांच्यापुढे तीनच मार्ग असतात. त्यात मॅनेजमेंटशी चांगले संबंध ठेऊन आपली कामे करून घेणे - ज्याला मुंगी होऊन साखर खाणे असेही म्हणतात. दुसरा मार्ग म्हणजे कोर्टामार्फत मागण्यांची तड लावणे. आणि तिसरा मार्ग म्हणजे वर्कींग स्टाफ फेडरेशनस् व पेन्शनर्स फेडरेशन या तिन्ही संघटनांनी कोऑर्डिनेशन करून प्रश्न सोडवणे. जे नुकतेच निवृत्त झालेत असे पेन्शनर्स कदाचित उपोषणाला बसू शकतील. पण आपल्या एकूण सभासद संख्येपैकी खूपजण ६४-६५ वयाच्या पुढे असल्याने त्यांच्या शारीरिक क्षमतेबद्दल सांगता येणे अवघड आहे. त्यांचा अशा उपोषणाच्या कार्यक्रमातील सहभाग गृहित धरून कार्यक्रम आखणे धोक्याचे ठरू शकेल. त्यांनी पुढे अशी सूचना केली कीं ज्यांना ज्यांना FPP/PQA धरल्यामुळे पेन्शन वाढीमुळे ॲरिअर्स मिळाले असतील अशा सभासदांनी त्यातील १०% देणगी म्हणून असोसिएशनला द्यावेत.

दुपारच्या जेवणाच्या सुटीनंतर फेडरेशनचे सल्लागार व माजी अध्यक्ष श्री.दांडेकर यांचे भाषण झाले. त्यात श्री.करमरकर व श्री.देसाई यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना खुलासेवार उत्तरे त्यांनी दिली. मद्रास हायकोर्टाच्या केसमधे जरी पिटीशनर्सच्या बाजूने निकाल लागलेला असला तरी कोर्टाच्या आदेशात म्हटल्याप्रमाणे बँकेने अगोदरच शिफारस करून ५० टक्के व ४० टक्के पेन्शन सातव्या व आठव्या बायपार्टाइटच्या रिटायरीजना देण्यासंबंधी तयारी दर्शवली होती. पण संप मिटवण्याचेवेळी ज्या मेमोरँडमवर सही झाली, त्याप्रमाणे फक्त आठव्या बायपार्टाइटच्या पेन्शनर्सना पेन्शन वाढ मिळाली. वास्तविक सातव्या बायपार्टाइटच्या पेन्शनर्सना कांहीही मिळालं नव्हतं. मध्यंतरी शेषाद्री यांनी, रिव्हू पिटीशन फाईल करू नको असा सल्ला दिला असतांनाही रिव्हू पिटीशन फाईल केला.आणि आता तर गव्हर्नमेंटने मद्रास हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध डिव्हिजनल बेंचपुढे अपील केले असल्याने लवकर निकाल लागण्याची शक्यता दूर गेली आहे.

कारण अशाच तऱ्हेचा निकाल लक्ष्मीनरसय्या यांनी दाखल केलेल्या दाव्याबाबतही २००३ साली झाला होता. पण अद्यापपावेतो त्यात कोणताही लक्ष्मीनरसय्या यांना अपेक्षित असलेला निकाल कोर्टाकडून मिळालेला नाही. लक्ष्मीनरसय्यांच्या कोर्ट केसमधे फेडरेशन इंप्लीड झालेले आहे. शेषाद्रीने तर त्याच्या केस बाबत कोणतीही कागदपत्रे आपल्या फेडरेशनला देण्यास नकार देऊन सहकार्य करण्याचे नाकारले. तेव्हा अशा व्यक्तीला आर्थिक सहाय्य असोसिएशन वा फेडरेशनने देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे कोणाही सभासदाला तसे आर्थिक सहाय्य देण्यास असोसिएशन सांगणार नाही. ज्यांना कोणाला अशी आर्थिक मदत द्यावयाची असेल त्यांनी आपापल्या जबाबदारीवर द्यावी.

वर्कींग स्टाफ फेडरेशन्सशी चांगले संबंध ठेऊनच आपली बरीच कामे होत असतात हे आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. १२ जुलै रोजी फेडरेशनची गव्हर्निंग बॉडी मिटींग झाली. त्यात आता आपल्या मागण्यांसाठी लवकरच उपोषणाला बसण्याचा कार्यक्रम आखून अंमलात आणण्याबद्दल चर्चा झाली. या कार्यक्रमात जास्तीत जास्त सभासदांनी भाग घ्यायचा आहे. त्यासाठी आपल्या पुणे येथील कार्यालयाकडे आपल्या संमतीबद्दल व भाग घेणार असल्याबद्दलचे नांव,पूर्ण पत्ता व फोन नंबर कळविण्यासाठी पोस्टकार्ड पाठविण्याची




Shri. Keshao Thaokar, AGM (PPG) Mumbai LHO being welcomed by Shri. V.M.Gokhale at Bank's Pensioners' Meet held on 22nd July 2009 at Ahmednagar

Shri. Naval Kishor Sharma, Asstt. General Manager (Region- 3) (Ahmednagar District) being welcomed at Bank's Pensioners' Meet held at Ahmednagar on 22nd July 2009







Shri. Keshao Thaokar, AGM (PPG) Mumbai LHO speaking on the occasion at Bank's Pensioners' Meet at Ahmednagar on 22nd July 2009

विनंती दांडेकर साहेबांनी केली. फेडरेशनचे हात बळकट करण्यासाठी पोस्टकार्डांचा पाऊस पडणे अपेक्षित आहे. झोनल सबसेंटर्सच्या ऑफिससाठी जागा घेण्यासाठी त्या त्या विभागातल्या सभासदांनी निम्मी रक्कम देणगी स्वरूपात जमा करणे आवश्यक आहे असे आपल्या अध्यक्षांनी पूर्वीच सांगितलेले आहे. एका सूचनेप्रमाणे बायपार्टाइट बोलण्याचेवेळी आपण ऑबझर्वर पाठवण्यासाठी इंडियन बँक असोसिएशनची व वर्कींग स्टाफ फेडरेशन्सची त्याला तयारी व संमती आवश्यक आहे.

भाषण संपवण्यापूर्वी श्री.दांडेकर यांनी स्वानुभवावरून सर्व सभासदांना नेत्रदानाचे महत्व समजावून सांगितले व तसे करण्याचे आवाहन केले. जवळ जवळ एक वर्षभर त्यांना दृष्टीदोष निर्माण झाल्याने दिसेनासे झाले होते. पण दोन अज्ञात व्यक्तींनी केलेल्या नेत्रदानामुळे ते आज दोन्ही डोळ्यांनी पाहू-वाचू शकतात. तेव्हा सामाजिक जबाबदारी म्हणून सर्वांनी नेत्रदान करावे. त्यांच्या भाषणानंतर आपले डोंबिवली येथील एक सदस्य श्री.जोशी यांनी देहदानासंबंधीचे महत्व विशद करून सर्वांना मृत्यूपश्यात देहदान करण्याचे आवाहन केले.

त्यानंतर बँकेने आयोजित केलेली पेन्शनर्स मीट सभास्थानी झाली. त्यासाठी बँकेचे पदाधिकारी पुणे झोनल ऑफिसमधून तसेच पी.पी.जी.डिपार्टमेंटमधून पुढील पदाधिकारी हजर होते. श्री.केशव ठावकर, सहा.महा प्रबंधक (पी.पी.जी.), श्री.अंबादास कुलकर्णी, डेप्युटी मॅनेजर (पी.पी.जी.), श्री.नवल किशोर शर्मा, सहा,महा प्रबंधक (अ.नगर, रीजन-३), श्री.एन.बी.कुलकर्णी, स.म.प्र.(प्रशासन),पुणे झोनल ऑफिस, श्री.सुधीर पवार, चीफ मॅनेजर (पी.अँड एच.आर.) पुणे झोनल ऑफिस, श्री.एन.बी.सावळे,डेप्युटी मॅनेजर व श्रीमती सुनीता घोडके. श्री.सुधीर पवार यांनी सूत्र संचालन केले. प्रथम सर्व पदाधिकाऱ्यांचे असोसिएशनतर्फे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर असोसिएशनतर्फे आपले अध्यक्ष श्री.गोखले यांनी प्रास्ताविक भाषण केले. त्यानंतर श्री.सुधीर पवार यांनी सभासदांना प्रातिनिधिक प्रश्न मांडावयास सांगितले. त्याप्रमाणे सभासदांच्या प्रश्नांना बँकेच्या संबंधित पदाधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. याप्रसंगी सर्वश्री नवल किशोर शर्मा, एन.बी.कुलकर्णी व ठावकर यांनी आपले विचार मांडले. शेवटी श्री.एन.बी. सावळे यांनी आभार मानले व पेन्शनर्स मीट संपन्न झाली.

आभार प्रदर्शन असोसिएशनतर्फे जॉइंट सेक्रेटरी श्री.भरत गुप्ते यांनी केले. तर अहमदनगर युनीटतर्फे श्रीमती पटवर्धन यांनी सर्वांचे आभार मानले. शेवटी श्री.पवन यांनी पसायदान म्हटल्यावर वार्षिक सभेची यशस्वी सांगता झाली.

**- सेक्रेटरी**

## असे घडले कलाकार.......

श्री गणेशोत्सव दोन अडीच महिन्यावर आला की सालाबादप्रमाणे स्टेट बँक स्टाफ कल्चरल कमिटी, कोल्हापूर तर्फे नाटकाच्या हालचाली सुरू व्हायच्या. गेली २५/३० वर्षे नाटक-एकांकिकांचा शिरस्ता, सिलसिला अजूनही चालू आहे. केशवराव भोसले नाट्यगृहात किंवा छ.शाहू स्मारक भवनात ३/४ प्रयोग सलग व्हायचे. १०/१२ नाटकांचे वाचन झाल्यावर कोणते नाटक करायचे यावर शिक्कामोर्तब व्हायचे. नंतर पात्रनिवड, नाट्यवाचन, संवादाच्या ट्रायल्स, अशा प्राथमिक प्रक्रिया १५/२० दिवस चालायच्या. नंतर १॥/२ महिने तालमी व्हायच्या. शक्यतो बँकेचे पूर्वानुभवी आणि नवीन शिकावू कलाकारांचा समावेश बँकेच्या नाटकात असावा असा कटाक्ष दिग्दर्शक या नात्याने माझा होता. एके वर्षी (साधारण २५/२८ वर्षांपूर्वी) नवीन इच्छुक कलाकारांच्या निवड चाचणीत बँकेच्या स्टाफमधील माधव कुलकर्णी, पंजाब भोसले, हेमंत नवरे हे तिघे पूर्वीचा काही अनुभव नसलेले, पण नाटकात काम (अभिनय) करण्याची प्रबळ इच्छा मनात ठेवून कलाकार म्हणून कळपात दाखल झाले. शब्दफेक, स्पष्ट उच्चार, अभिनयक्षमता या चाचण्यातून तिघेही १५/२० वाक्यांची छोटी भूमिका करू लागले. पुढील १०/१५ वर्षात माधव कुलकर्णीने मोठ्या भूमिका नायकाच्या भूमिकेतून पूर्ण २/३ अंकी. उदा. 'प्रेमाच्या गावा जावे', 'छू मंतर', 'शांतेचं कार्ट', 'वटवट सावित्री', 'तरुण तुर्क' वगैरे समर्थपणे पेलण्याची क्षमता सिद्ध केली. माधव त्याच्या अभिनय, उत्तम शब्दोच्चार, पाठांतर या गुणांनी माझा आवडता गुणी कलाकार ठरला. त्याचबरोबर हेमंत नवरे, पंजाब भोसले हेही विविध विनोदी, गंभीर भूमिका समर्थपणे निभावतात. असे आणखीही बरेच कलाकार स्टेट बँकेत तयार झाले. त्यांना बाहेरही स्पर्धात्मक नाटकांतून मागणी येते. प्रबळ इच्छाशक्ती, शिकण्याची तयारी, मेहनत करणाऱ्या कोणालाही हे शक्य आहे. I am proud of my heros.

**- प्रभाकर कानिटकर,** कोल्हापूर
दूरध्वनी : ०२३१-२६५२८५९

## अभिनंदनीय

आपले सभासद श्री.सिताराम तेरवाडकर यांच्या स्नुषा डॉ.सौ.शार्दुली तेरवाडकर, दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्ग येथे गेली ६ वर्षे पतीसह कार्यरत आहेत. त्यांचे पती सॉफ्टवेअर इंजिनिअर असून त्यांचा तिथे स्वत:चा व्यवसाय आहे.

डॉ.शार्दुली यांनी दक्षिण आफ्रिकेतील 'औषधी वनस्पती व भारतातील औषधी वनस्पती यांचा तुलनात्मक अभ्यास' करून एक प्रबंध प्रकाशित केला आहे. त्याबद्दल त्यांना भारतातील व परदेशातील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. डॉ.सौ.शार्दुली यांचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन. - सेक्रेटरी

# Four Ways To Change Life

It is important how we interact with relatives, friends and people we meet on the street for our own happiness. All of us are 'Born to Win'. We are born with the deep source of energy, creativity and passion. We can ignite these sources by 'learning to love what we do even though initially we may not be doing exactly what we love..... We have a choice about the way we work though we may not be able to choose the work we do'.

**Choosing your Attitude**

I have read about a grand lady who always brought love and smile to her work. Her grand children wanted to help her in the kitchen because washing dishes with grandma was so much fun. As Peter Drucker said, 'Performing organizations enjoy what they are doing'. When we make a choice, the resultant enjoyable spirit is infectious. This is the first way to change life for the betterment by removing a chip on our shoulders.

It is alright for us to want only the best for ourselves. But, that is the source of problem and stress. We have to live our life and for the living, job or business or profession and earnings are necessary. These are the tools to make life happy. If we concentrate on the tools forgetting that these are necessary to live life happily and shift focus away from life by not choosing our attitude to tools exclusively, the life can't be enjoyed.

Some times at work place or at home, atmosphere of prison is created with lack of faith in oneself. This is caused by the way we choose to behave. '*Jaga he Bandishaala*' (this world is a prison) is a famous Marathi song. Our attitude and faith in ourselves decide whether we will be in a prison like situation or in a free enjoyable atmosphere. One has to continue to learn through out the life. Some people stop learning and growing. Their clock stops at a particular time in life. But, many persons enjoy growing by a continuous process of learning even at old age.

We can not control how other people behave. But we have a choice to respond. Reacting and feeling like a victim would not solve the problem. The problem needs to be confronted. It is important that if we are knocked down, we should get up. Getting knocked down is not a failure, but not getting up is; choosing attitude is absolutely essential.

**Play**

The world famous Pike Place Fish Market at Seattle has come to be known as such due to creation of a playful atmosphere in the process of selling and exporting fish which is run to make profit. In the process, they enjoy work that can be tedious. They are proud of what they do and the way they do it. And they have become world famous while selling and exporting fish, providing lessons to boost morale and improve results in any work place.

**Live In The Present**

As Vince Lombardi says in his book 'Winning Is A Habit', "Hurt is in the mind….Win or lose if you do not put it behind you, you will be wading around all weak knee deep in confusion. It is important to live in the present moment.

"The past is history; the future is mistery; today is a gift; that is why we call it the present". This attitude will give the best results in life because 'when you are present you show consideration to the other persons'.

**Making A Day**

In our morning walk group, one person sings devotional songs some of which were originally sung by Bharat Ratna Bhimsen Joshi. We call the singer Park Ratna or Udyan Ratna. He daily sings some songs. When rains were delayed, we requested him to sing Megha Malhar raag. He did it and on the next day it started raining. Thus his days are made. Those who interact with him also make their days.

We have another companion who is a Bengali. After studying up to three or four standards, he came to Mumbai as a worker in jewellery industry and now his brother and he own their unit, employing workers. We call him Park Obama. Another companion in the morning walk group had a trip to the US . After visiting the While House at Washington DC , he remembered Park Obama and sent me an email which was conveyed to Park Obama. This is how morning walkers make their day and be happy.

**Conclusion**

In Sept 2001, my wife & I went to Seattle to board the Alaska Cruise in the last state of the USA . Since we had some time on hand while moving about in Seattle , we came across the World Famous Pike Place Fish market. We witnessed the whole sale fish market . A book titled Fish has been written by

Stephen C Lundin, Ph.D. Hary Paul and John Christensen. The story in the book has been developed on the way the Pike Place Fish Market operates. This article is mainly based on the book for the benefit of those who want to be or continue to be happy in life at home, work place and at both the places. It has become US business best selling book to boost morale in the business.

***- S V Naik***
Cell : 9821127616

## I know I was old when..........

A waiter gave me the Senior Citizen Discount when I didn't even ask for it.

I know I was old when......

I had my fourth grand-child. I stopped colouring my hair.

When I saw a sign on the tree way which said "Forgive and Forget. It will add years to your life".

I said to my spouse I am getting so good at the forgetting past, I may live forever.

I helped an old lady across the busy intersection and she turned out to be my wife.

I kissed my wife and she yawned.

I know I was old when a kindergarten student looked up at me and said - "whose grandfather are you ?"

(from New york Times)

***Collection by - M.D. Dalal, Nashik***
***Phone - (0253) 2597197***

## विस्मरण

रामभाऊ : 'डॉक्टर साहेब, हल्ली मला विस्मरण फार वेळा होते.'

डॉक्टर रामभाऊंना तपासून औषधे देतात. औषधे घेवून रामभाऊ घरी निघतात.

डॉक्टर : 'अहो रामभाऊ, माझी तपासण्याची फी, औषधाचे पैसे द्या.'

रामभाऊ : 'कशाचे पैसे? कधी तपासलंत ? कधी दिलंत औषध?'

**- पु.नि.देशपांडे,** अमरावती

## सुखनिधान

अशी मूर्त चैतन्याची, उभा विठ्ठल वीटेवरी
ठेवुनि कर कटीवरी, पाहे वाट जरी
उभा विठ्ठल सावळा, असे आनंदाचे मूळ
लागे भक्तांना खूळ, दर्शनमात्रे होई दूर
असा विठ्ठल रखुमाई जोडा, असे बा जगावेगळा
मूर्तीत काळा सावळा, परि रुक्मिणीला लळा
म्हणोनिया संत गेला, 'सुंदर ते ध्यान'
ठेवी मनी तेच रूप, साऱ्यांचे जे सुखनिधान

**- कल्पना सुभाष कोठारे, सांताक्रुझ**
दूरध्वनी - ०२२-२६१०४५५२

## तारुण्य

आयुष्य कसे मी वेगळेच जगलो
कधी स्वत:साठी तर कधी दुसऱ्यांसाठी जगलो ।
निर्भेळ आनंद त्यात मला सदैव मिळाला
एका आगळ्यावेगळ्या अनुभूतीत मी नेहमी रंगूनच गेलो ।।
आता मात्र ऐकायचे युग सुरू झाले आहे
अधिकाराचे सुख कसे संपूनच गेले आहे ।
हे निवृत्तीनंतर हळूहळू मला कळले
खुर्ची गेलेल्या नेत्याचे स्थान मला आता मिळाले आहे ।।
निवृत्तीनंतरची स्वप्ने कशी हवेतच विरून गेली
अपेक्षिली होती ती कल्पनेत नाही उतरली ।
दोघेच असल्याने रंगीन स्वप्नांची दुनिया खुणवायची मला
पण तिला मात्र ती बाब सदैव गौणच वाटली ।।
रंगलो नातवंडांत मी, जाणवला वेगळेपणा
तिथे असायचा नेहमीच खूपसा आपलेपणा ।
नाते आजोबा-नातवांचे मी मनांत खूप जपले
निर्भेळ निर्व्याज प्रेमांत नव्हता कधी बेगडेपणा ।।
आयुष्याच्या संध्याकाळी बरोबरीचे आम्ही जमतो
जुन्या नव्या गोष्टींचे रवंथ पुन्हा पुन्हा करतो ।
मिळालेले पण आता दुर्लभ झालेले सुख शेअर करतो
अन् घरी परततांना ताजेतवाने अन् तरुण होऊन जातो ।।

**- रमेश त्रि. इंगोलीकर,**
राजापेठ, अमरावती

# WHERE I AM AND WHERE I WANT TO BE

When we undertake a journey, the destination is pre-determined. According to the distance, time for travel and the duration of the stay at the place, we plan our baggage. Items to be carried with are planned based on the estimation of these aspects. The ultimate aim of such planning is to make our journey, as an experience full of happiness and enrichment. Despite unpleasant experiences one seldom gets disheartened but continue journey next time with renewed zeal and vigor.

Our soul is associated with a journey of life where the destination is predetermined but the time to reach the destination is unknown. Our baggage is full of treasure that would last long much beyond the journey but the contents thereof are known only when the soul makes honest efforts to explore. The journey of life needs to be undertaken continuously by the soul and one can't re-visit the same station once it is crossed over.

In such a situation, each one of us is free to decide where he or she is and where he [or she] would like to be. As one of the such souls, I made an attempt to introspect and thought of articulating as to where I am and where I would like to be.
My revelations are as under.

**WHERE I AM**

I have found myself placed beneath the lantern full of darkness not realizing that there is certainly the light present just above .I am at the bottom because I have chosen to be full of miseries, hatred and cruelty to fellow beings all through my life. I ignored the fragrance of the flower, twilight of the rising Sun in the morning and the magnimity of the ocean. Jealousy is my way of life. I am so self centered that If some one is found to be enjoying a fruit,

I feel miserable. I desire that every fruit must be mine before being even seen by others .In this journey of life, I thought my body is supreme and never realized that my soul within me is in fact the one who would be traveling instead. At present, I am ignorant, and directionless.

**WHERE I WOULD LIKE TO BE**

I passionately desire to be near the light of the lantern and I am aware that the darkness that has engulfed me is my own creation. When the journey was started, I had in store for m e many options which easily would have taken me right into the light. Instead, I opted to be otherwise. With realization of my misdeeds, I prefer to continue the journey with renewed zeal. may be call it a Second Innings. I would like to be the soul full of passion, compassion, and devotion. I solicit the blessings of the enlightened soul to guide me in my venture.

***- Anil L Shewade***
Panaji Goa

## खरी गंमत

पस्तीस वर्षे स्टेनोग्राफर म्हणून नोकरी करून निवृत्त होणाऱ्या चिंतोपंतांना सहकाऱ्यांनी समारंभपूर्वक निरोप दिला. त्यावेळी एकजण म्हणाला, 'स्टेनो म्हणून काम करताना आलेल्या अनुभवातील एखादी गंमत सांगा की.'

चिंतोपंत म्हणाले, 'खरी गंमत म्हणजे मला स्टेनोग्राफी येतच नाही. पण कुठल्याही साहेबाला डिक्टेशन देता येत नव्हते. त्यातून कुणी इंग्रजी डिक्टेशनचा प्रयत्न केला तर मी म्हणायचो की मी मराठी स्टेनो आहे आणि मराठीचा प्रयत्न केला तर सांगायचो की मी इंग्रजी स्टेनो आहे. अशीच पस्तीस वर्षे काढली.'

**- पी.के.देवधर, पुणे**

************

शब्दांच्या लडीतून घरंगळत, बनते नाव शब्दांची
वाचून सगळे खूष होतात, तारीफ करीत कवितेची

**- शरद महाबळ,** पुणे

## आमचं उत्पन्न बुडतंय

पोलिस - ''ही बंगल्याबाहेर कार उभी आहे. ती तुमची आहे का ?''

मालक - ''हो ! माझीच आहे, कां ?''

पोलिस - ''एकतर गाडी आत घ्या. नाहीतर इथून दूर लावा.''

मालक - ''का ? तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे ? गाडी रस्त्याच्या खाली कडेला उभी आहे. येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांना काही अडथळा अडचण नाही.''

पोलिस - ''ते ठीक आहे. पण आम्ही इथं सापळा लावलाय. वेग मर्यादेचं उल्लंघन करणाऱ्या गाड्या पकडण्याकरिता.''

मालक - ''मग ठीक आहे. धरा त्या वेगवान गाड्यांना !''

पोलिस - ''ठीक काय ? तुमची गाडी इथं उभी पाहून प्रत्येकजण गाडीचा वेग आधीच कमी करतो. ''

मालक - ''मग बरंय ना. तुमचं काम वाचतंय. !''

पोलिस - ''बरंय काय ? साहेब रागावलेत. म्हणतात की सरकारचं अन् आमचं उत्पन्न बुडतंय !''

**- मधु रानडे, नाशिक**

# श्री भास्कराय नम:



१९६१ मधील घटना. आपल्या भारत शासनाने सैनिकी कारवाई करून गोवा पोर्तुगीजांच्या जोखडातून मुक्त केला होता. या सत्तान्तरानंतर लष्करी प्रशासक मे.ज.कॅण्डेथ यांच्या नेतृत्वाखाली कारभार चालू होता. नव्या शासनाविषयी तेथील जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी कुशल नागरी अधिकाऱ्यांची गरज होती. म्हणून लष्करी प्रशासनाने रिझर्व्ह बँकेकडे परकीय चलन व्यवहारातील तज्ज्ञ अशा अधिकाऱ्याची मागणी केली. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने भारतीय स्टेट बँकेकडे विचारणा केली आणि भारतीय स्टेट बँकेने श्री.भास्कर रामचंद्र गद्रे यांची निवड करून त्यांना गोव्यात पाठविले. श्री.गद्रे साहेबांनी आपल्यावरील जबाबदारी मोठ्या कौशल्याने पार पाडली. अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले होते हे खरे. पण पाठीशी मोठा अनुभव असल्याने सर्व समस्या सोडविण्यात ते यशस्वी झाले. व्यावसायिक ज्ञानाबरोबरच त्याच्यापाशी कार्यकुशलता आणि कामाविषयी कळकळ होती.

श्री.गद्रेसाहेबांचा जन्म १३ ऑगस्ट १९२० रोजी सातारा येथे झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. १९३६ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर गद्रेसाहेब १९४० साली बी.एस्सी.परीक्षा प्रथम श्रेणीत डिस्टिंक्शनसह उत्तीर्ण झाले आणि स.प.महाविद्यालयात फेलो म्हणून त्यांची नियुक्ती झाली. पुढे १९४२ साली एम्.एस्सी. साठी अभ्यास करत असताना फर्ग्युसन, स.प., वाडिया आणि इंजिनियरिंग या महाविद्यालयांचे एकत्रित वर्ग चालत असल्याने त्यांना रँ.महाजनी, रँ.केरकर, रँ.चंद्रात्रेय अशा विद्वान प्राध्यापकांच्या अध्यापनाचा लाभ झाला. एम.एस्.सी.उत्तीर्ण झाल्यावर त्यावेळच्या हुशार विद्यार्थ्यांच्या 'क्रेझ' प्रमाणे ते आय.सी.एस्. कडे वळले असतेही. पण प्रथम बॉम्बे प्रोव्हिन्स होम सर्व्हिसची परीक्षा देऊन उच्च श्रेणीत उत्तीर्ण होऊन १९४२-४३ मध्ये सचिवालयातील गृहखात्यात काही दिवस काम केलेही. पण लग्नाप्रमाणे नोकरीचे योगही ठरलेले असतात. त्यानुसार ०१/०९/१९४३ रोजी गद्रे साहेब प्रोबेशनरी अस्टिस्टंट म्हणून इंपिरियल बँकेत रूजू झाले. १९४३ ते १९५५ या कालावधीत मुंबई, पुणे, सिकंदराबाद, देवळाली, पुन: मुंबई, वर्धा, चंद्रपूर इ. ठिकाणी काम केल्यावर १९५५ ऑगस्टमध्ये ते बडोदा येथे एजंट झाले. १९५७ फेब्रुवारी नंतर पुन: रायपूर, इंदूर, सेंट्रल ऑफिस, लंडन (ब्रिटिश कौन्सिल मार्फत ट्रेनिंगसाठी) भिलई, कलकत्ता (फॉरिन एक्सचेंज डिपार्टमेंट) अशा महत्त्वाच्या ठिकाणी जबाबदारी पार पाडल्यावर या लेखाच्या सुरूवातीस सांगितल्याप्रमाणे गद्रेसाहेब पणजीला बँक नॅशनल अल्ट्रा मारिनोचे कस्टोडियन म्हणून आले. नुकत्याच झालेल्या सत्तान्तरामुळे सर्वसामान्य ग्राहकाबरोबर मोठ्या मोठ्या कंपन्यांचे आर्थिक प्रश्न मोठ्या दक्षतेने सोडविल्यामुळे गद्रेसाहेब तेथेही लोकप्रिय झाले. तेथून पुढे त्यांची हिंदुस्थान कमर्शिअल बँकेवर प्रतिनियुक्ती झाली. त्यानंतर डिस्ट्रिक्ट सुपरिटेंडेंट म्हणून काम केल्यावर कोलंबो, लंडन, न्यूयॉर्क इ. ठिकाणी महत्त्वाची पदे भूषविल्यानंतर १९७७ डिसेंबर मध्ये श्री.गद्रेसाहेब चीफ जनरल मॅनेजर या पदावरून निवृत्त झाले. हा झाला त्यांच्या बँकेतील कारकीर्दीचा धावता आढावा.

सेवानिवृत्तीनंतर पुढे वेळ कसा घालवायचा हा प्रश्न गद्रेसाहेबांपुढे अजिबात नव्हता. १९३८ सालीच रा.स्व.संघाचे ते प्रतिज्ञित स्वयंसेवक झाल्याने समाजसेवेचे धडे आधीच गिरवले गेले होते.

श्री.दादाराव परमार्थ, विनायकराव आपटे यांच्या सहवासात संघटन कौशल्य अंगी बाणल्यामुळे ते १९७८ ते १९८२ पर्यंत पुणे महानगर संघचालक म्हणून नियुक्त झाले. गद्रेसाहेबांच्या परदेशातील वास्तव्याचा लाभ संघटनेलाही झाला. १९८४ मध्ये ब्रॅडफर्ड विद्यापीठाच्या आवारात इंग्लंडमधील तीन हजार स्वयंसेवकांचा मेळावा घेण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली. १९८९ साली डॉ.हेडगेवार यांच्या जन्मशताब्दी निमित्त विराट हिंदुसंमेलन प्रसंगी एक लाख स्वयंसेवकांची उपस्थिती होती. या कामी गद्रे साहेबांची जबाबदारी फार मोठी होती. अर्थात् अशी कामे सर्वांच्या सहकार्यानेच होतात, कोणा एकाच्याने होत नाहीत, असे ते आवर्जून सांगत. १९९० जानेवारीमध्ये तत्कालिन ब्रिटिश पंतप्रधान श्रीमती मार्गारेट थॅचर यांना गद्रेसाहेबांनी संघाच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नाने प्रमुख पाहुणे म्हणून आणले. ट्रिनिदादमधून ब्रिटिश सर्व्हिसमध्ये यूथ मूव्हमेंटची जबाबदारी असलेल्या ख्रिश्चन अधिकाऱ्याने संघाचे काम बघून प्रिन्स चार्लस् फंडातून १००० पौंडाची देणगी, स्वयंस्फूर्तीने आणि विना अट दिली. (लंडनमध्ये स्टेट बँकेत काम करीत असताना गद्रे साहेबांनी बँकेच्या लंडन शाखेचा वार्षिक नफा रू. पन्नास-साठ हजार पौंडावरून एक दोन वर्षात ९ लक्ष पौंडावर नेऊन ठेवला होता. याची सहजच आठवण येथे नमूद करून ठेवतो.)

परदेशात काम करीत असताना ते केवळ नोकरी पुरतेच मर्यादित राहिले नाहीत. तर एक प्रकारे भारताचे सांस्कृतिक प्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी आहे, असे समजून गद्रेसाहेब विशेष समारंभाचे आयोजन करीत असत. ते अमेरिकेत असताना तत्कालिन अर्थमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण तेथे आले होते. नवरात्रातील ललितापंचमीच्या दिवशी आपल्या महाराष्ट्रीयन पद्धतीचा पुरणावरणाचा स्वयंपाक करून सौ.इंदिराबाई गद्रे यांनी यशवंतरावांना घरच्या जेवणाची आठवण करून दिली. क्रिकेटसाठी आलेले भारतीय खेळाडू काय किंवा विश्वविख्यात गायिका लता मंगेशकर यांचा रॉयल अल्बर्ट हॉलमधील कार्यक्रम काय, गद्रेसाहेब सहकार्याचा हात पुढे करून उभेच असत.

स्वत: गणिती असणाऱ्या गद्रेसाहेबांना पहिल्यापासून गणित अध्यापनाची मनस्वी आवड. त्यामुळे जेथे जातील तेथे हौस म्हणून

(आणि अर्थातच विनामूल्य) गणिताच्या शिकवण्या केल्या. (क्लास नव्हे.) गणितापासून अचूकता आणि नेमकेपणाची सवय लागते, ही त्यांची धारणा. तर गीतारहस्याच्या वाचनाने निष्काम कर्मयोगाची शिकवण मिळाली असे ते मोठ्या आदराने सांगत. असा हा गणिती कर्मयोगी कवीही होता. संस्कृत महाकाव्याचे वाचन आणि अनुभवाधिष्ठित चिंतन यातून स्फुरलेल्या त्यांच्या कवितांचा संग्रह मात्र अजून अप्रकाशितच आहे.

आपल्या स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशनची अध्यक्षपदाची धुरा त्यांनी १९८९ पासून सहा वर्षे सांभाळली. आपल्या फेडरेशनचेही अध्यक्ष म्हणून काम १९९३ ते ९६ सांभाळत असताना रु.२ लाखाची पहिली 'रिटायर्ड एम्प्लॉईज मेडिकल बेनिफिट स्कीम' बँकेचे त्या वेळचे अध्यक्ष श्री.काकोडकर यांचे सहकार्याने मंजूर करून घेतली. या योजनेचे महत्त्व समजावून सांगून न थांबता एका सेवानिवृत्त सहकाऱ्यांच्या मेडिकल स्कीमसाठी प्रीमियम परस्पर भरून गद्रेसाहेब मोकळे झाले होते.

आपल्या निष्ठांनुसार कर्तव्ये पार पाडल्यावर एक प्रकारची कृतार्थता अनुभवणारे श्री.गद्रेसाहेब यांच्याकडे पाहिल्यावर मला महाकवी कालिदासाच्या 'रघुवंशा'तील श्लोकाची आठवण येते.

''बलमार्तभयोपशान्तये विदुषां सत्कृतये बहुश्रुतम् ।
वसु तस्य विभोर्न केवलं गुणवत्तापि परप्रयोजना ।।''

परमेश्वरकृपेने लाभलेली शक्ती, बुद्धी, संपत्ती एवढेच काय गुणसंपदा ही केवळ स्वसुखासाठीच आहे, असे न मानता समाज, राष्ट्र यांचेही आपण काही देणे लागतो असे कृतीने दाखविणारे लोक विरळच असतात. गद्रे साहेब त्यापैकीच एक होते. ''राष्ट्राय स्वाहा, राष्ट्राय इदं न मम।'' ही धारणा सदैव जागृत ठेवणाऱ्या गद्रेसाहेबांवर परिचयपर लेख लिहिण्याच्या निमित्ताने मी त्यांना १९९९ साली भेटलो तेव्हा त्यांना कै.पाबळकर, कै.चाफळकर या पूर्वाध्यक्षांच्या नि:स्वार्थी कामगिरीचे स्मरण झालेच. असोसिएशनच्या सर्व सहकाऱ्यांच्या पूरक सहयोगाची आठवण झाली.

ज्ञान आणि अनुभव या बरोबरच समर्पण वृत्ती, संघटनकौशल्य आणि सर्वत्र संचार यामुळे गद्रेसाहेब म्हणजे सर्वांसाठी आदराचे स्थान झाले होते. 'चॅरिटी बिगिन्स ॲट् होम' या उक्तीला अनुसरून गद्रे साहेबांनी आपल्या संघटनेला अनेक वेळा आर्थिक साह्यही केले. अफाट वाचन, विलक्षण स्मरणशक्ती आणि आकर्षक कथनशैली यामुळे त्यांच्याशी संवाद म्हणजे ऐकणाऱ्यांना पर्वणी असे. सुदैवाने काही आठवणी ध्वनिमुद्रितही झाल्या आहेत. कै.ल.ना.पाबळकर स्मृत्यर्थ असलेल्या सुवर्ण पदकाचे प्रथम मानकरी म्हणून आपल्या पेन्शनर्स असोसिएशनने त्यांचा सन्मान केला.

दि. २२ जुलै २००९ ला अहमदनगरच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला श्री.गद्रेसाहेब आले असते तर त्यांच्या पितृतुल्य मार्गदर्शनाचा लाभ झाला असता. पण नियतीची इच्छा वेगळीच होती. फक्त दोनच दिवस आधी म्हणजे दि २० जुलै रोजी गद्रे साहेबांनी या जगाचा शांतपणे निरोप घेतला. परिणामी श्री.दांडेकर साहेब, गोखले साहेब इ. मंडळी जी गद्रेसाहेबांना भेटण्यासाठी उत्सुक होती त्यांच्यावर कै.गद्रेसाहेबांना श्रद्धांजली वाहण्याचा प्रसंग ओढवला. आपली संघटना एका ज्ञानी पण निगर्वी, कर्तृत्वसंपन्न आणि उदार, संघटन-कुशल नेतृत्वास पारखी झाली आहे.

**'ऐसी किर्ती करून जावे । तरीच संसारास यावे ।।'** ही समर्थोक्ती सार्थ करून दाखविणाऱ्या आदरणीय कै.गद्रे साहेबांना विनम्र श्रद्धांजली.

– श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे, पुणे
भ्रमणध्वनी – ९८२३२८५३९०



# येई वर्षादेवी

'येई वर्षादेवी, मेघांचे गर्जन, विजेचे नर्तन, अमृतसंभार सांगाती घेऊन येई वर्षादेवी' या कृ.रा.निकुंभाच्या काव्यपंक्तीबरोबरच ग.ल.ठोकळांची 'आलोच पहा ग्रीष्म अशी दे ललकारी, घामेजून अंगांग निघे चिंब उन्हाने' अशीही कविता होती आम्हाला शाळेत असताना ! वसंत ते शिशिर अशा सृष्टीच्या ऋतुचक्राची तसेच सूर्योदय चन्द्रोदयाच्या रोजच्या अचूकतेचे त्या बालवयात खूप आश्चर्य वाटत असे. म्हणून तर 'नेमेचि येतो मग पावसाळा' चे सुद्धा त्यावेळचे कौतुक आजही ओसरत नाही.

वैशाख वणव्यात भाजून निघाल्यावर मृगाच्या पहिल्या पावसाची चातकासारखी ओढ असते. केव्हा एकदा 'वसंतातले कूजन सरते' आणि पहिल्या पावसाच्या वासाने माती फुलारते असं होऊन जातं. आयुष्यातले इतके पावसाळे गेले तरी दरवर्षीच्या शाळेच्या पहिल्या दिवसाप्रमाणे पहिल्या पावसाची वाट पहाणे संपत नाही. फक्त वाईट एकाच गोष्टीचं वाटतं की रखरखत्या उन्हातही डोळ्यांना आल्हाद देणाऱ्या सुंदर गुलमोहराच्या फुलांचा पहिल्या पावसात बळी जातो.

शाळा आणि पावसाळा बहुतेक बरोबरच सुरू होतात. नवी पुस्तके, वह्या, दप्तरे, छत्र्या, रेनकोट या सगळ्या नव्याची नवलाई. पूर्वी आपल्या, मग मुलांच्या, आता नातवंडांच्या अशी वयाची उतरती आणि खर्चाची चढती भाजणीची परंपरा अजूनही चालू आहे. पहिल्या पावसाच्या वर्षावात बागडायला आणि भिजायला आवडेनासं झालं की आपल्या आयुष्याच्या 'शिशिरा' ची सुरुवात झाली असं खुशाल समजायला हरकत नाही.

शाळा कॉलेजात गणिताची आवड असो वा नसो सत्तावीस वजा नऊ याचं उत्तर शून्य ज्याला माहिती आहे त्याने व्यवहाराचं गणित सुटलं असं गृहीत धरायला हरकत नाही. कारण वर्षाच्या सत्तावीस नक्षत्रांपैकी पावसाची नऊ कोरडी गेली की हाती काय उरणार ? 'शून्य'च ना ?

'साता जन्माच्या गाठी' बांधणाऱ्या वटसावित्रीच्या व्रताने भगिनींच्या सणवारांना, व्रतवैकल्यांना आणि उपासतपासांना सुरूवात होते ती ज्येष्ठपौर्णिमेला. परवाच कुठेतरी ऐकलं की सत्यवान झाडावरून पडून बेशुद्ध झाल्याने सावित्रीने त्याला भरपूर प्राणवायूचा पुरवठा करणाऱ्या वडाच्या झाडाखाली आणलं. शुद्ध हवा मिळाल्याने सत्यवान शुद्धीवर आला किंवा कथापुराणांच्या भाषेत सावित्रीने त्याचे प्राण यमाकडून परत मिळविले. इतक्या साध्या विज्ञाननिष्ठ सत्यावर धार्मिक साज चढविणाऱ्या आपल्या पूर्वजांच्या चातुर्याचे व बुद्धिमत्तेचे कौतुक करावे तितके कमी आहे. कारण वडाच्या विस्ताराला जशा मर्यादा नसतात तसा आपला वंशवृक्ष फुलावा, फळावा अशी सावित्रीने वडाची प्रार्थना केली तर नवल कसले ?

एकेकाळी 'सोयरे वनचरे' असलेल्या वृक्षवनांची राजरोस कत्तल होत असताना त्यात भर म्हणून तोडलेल्या वडाच्या फांद्या घरी आणून त्याची पूजा करण्यापेक्षा एखाद्या नवीन वटवृक्षांची लागवड करून 'साता जन्माचा सोबती' मागण्याऐवजी पुढच्या सात पिढ्यांच्या पर्यावरणाची काळजी घेणारी आधुनिक वटपौर्णिमा साजरी करता येणार नाही का ?

'घनघनमाला नभी दाटल्या' आणि आषाढाच्या धारा कोसळायला लागल्या की मन परत मागे जाते आणि आठवते ती राजकवी यशवंतांची कवितेमधील पावसाळ्यातल्या रायगडाचे वर्णन- 'आषाढातील कृष्णघनांच्या थकलेल्या पंक्ती, प्रासादाच्या शिखरावरती घेती विश्रांती'. मग मात्र जणू काळ्याशार ढगांमागे दडलेला शिवरायांचा रायगडावरचा राजप्रासाद मनःचक्षूसमोर तरळून जातो. त्या पाठोपाठ शिवशाहीर बाबासाहेब पुरंदऱ्यांनी पुरंदर किल्ल्याचा सांगितलेला किस्साही आठवल्याशिवाय रहात नाही. पेशवेकालीन पुरंदरच्या किल्लेदाराच्या मुलाने 'शेवाळ माजते', हे एकच वाक्य सांगून जाते की आपल्या शूर पूर्वजांची लेखणीही त्यांच्या तलवारीच्या पात्याप्रमाणेच लखलखती होती!

इतिहासाचंच कशाला ? 'नको नको रे पावसा, असा धिंगाणा अवेळी I घर माझे चन्द्रमोळी आणि दारात सायली' अशी पद्मा लोकुरांच्या कवितेतील एखादी ओळ आठवली तरी आषाढातला पाऊस ही काय चीज आहे याची कल्पना येते. फार कशाला ? अगदी महाकवी ग.दि. च्या अगदी साध्या चित्रपटगीतातली 'वर्षाकालीन सायंकाळी लक्ष तेवती दीप गोकुळी' ची आठवण झाली तरी 'सावळ्याची जणू सावली' आणि चार दिवसांनी असलेली गोकुळातली सांज अगदी अलगदपणे आपल्या मनात उतरते.

मग आषाढात पंढरपूरच्या परब्रह्माची एकादशी 'गुरुसाक्षात परब्रह्मां'ची पौर्णिमा, आषाढ संपताच श्रावणधारा धरतीच्या कलशात रिमझिम करत बरसू लागतात आणि मग 'क्षणात येते सरसर शिरवे' माणिक क्षणात फिरूनी उन पडे' असा 'ऋतु हिरवा ऋतु बरवा' सुरू झाली की काय विचारता ? 'सरीवर सरी आल्या की' ही बा.भ.बोरकरांची कविता गोपींबरोबरच आपल्याही मनाला 'सचैल' न्हाऊ घालते. 'हरिततृणांच्या मखमली' वर खेळणारी बालकवींची 'ती फुलराणी' मनातून जायला तयारच नसते. रेशीमधारा बरसणाऱ्या श्रावणातल्या घननीळाच्या स्वागताला येणारं इंद्रधनुष्य जीवनातले सप्तरंग दाखवून जातं आणि ऊनपावसांचा खेळही !

मंगळागौर, नागपंचमी, गोकुळअष्टमी, नारळीपौर्णिमा अशा अनेकविध आनंदांची लयलूट असलेला श्रावण संपताना येणारी पिठोरी अमावस्या बळीराजाचं सर्वस्व असलेल्या गोवत्साची पूजा करताना मातृऋणाचीही आठवण करून देते आणि त्याचबरोबर आजवर अनुत्तरित ऊनपावसांचा खेळही !

मंगळागौर, नागपंचमी, गोकुळअष्टमी, नारळीपौर्णिमा अशा

अनेकविध आनंदाची लयलूट असलेला श्रावण संपताना येणारी पिठोरी अमावस्या बळीराजाचं सर्वस्व असलेल्या गोवत्साची पूजा करताना मातृऋणाचीही आठवण करून देते आणि त्याचबरोबर आजवर अनुत्तरित राहिलेला प्रश्नही विचारते 'अतीथ कोण ?'

वर्षा ऋतु सरतासरताच येणारे गणपती समाजातल्या सर्व थरातील भक्तांना एकत्र आणतात. दहा दिवस रंगलेल्या आरत्या, कथाकीर्तने, नाटके अशा अनेकविध कार्यक्रमांनी मंतरलेले दहा दिवस कसे जातात हे कळेपर्यंत येते अनंतचतुर्दशी 'गणपती बाप्पा मोरया' म्हणून निरोप देतानाच 'पुढच्या वर्षी लवकर' येण्याचा आग्रहही असतो. 'शुभास्ते पंथान:' म्हणतानाच 'पुनरागमनाय'ची हुरहुर असते. कारण यामागे नाथांच्या भारुडातली 'इथुन पुढं बरं व्हईल' शाश्वी भाबडी आशा दडलेली असते. 'सृजन आणि विसर्जन' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हा महान संदेश देणारे गणराज हेही विचारतात. 'दहा दिवस माझ्या भजनपूजनात घालवता मग विसर्जनाच्या वेळी माझी विटंबना करून वर पाणी प्रदूषित का करता ?' पण लक्षात कोण घेतो ?

गणेशोत्सव व नवरात्रोत्सव यांचा जोडणारा पंधरवडा आपल्याला सोडून गेलेल्या आप्तेष्टांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यासाठी ठेऊन आपल्या पूर्वजांनी साधलेले औचित्य थक्क करणारे आहे. वर्षभराच्या कामाच्या धबडग्यात त्यांची आठवण करायला वेळ नाही ना मिळाला ? मग या दोन आठवड्यात तिथीनुसार पितरांच्या स्मृतीला वंदन करा नाहीतर सर्वपित्री अमावस्या आहेच. दोन आनंदमहोत्सवांना अशा रितीने जोडून 'सुखस्या नंतरम् दु:खम् दु:खस्यानंतरम् सुखम्' ही शिकवण हिंदु धर्माचे खास वैशिष्ट्य.

तर अशी आहे वर्षादेवी 'तुमच्या चातुर्मासा' ची कहाणी. नऊ नक्षत्रांनी नटलेली. या नक्षत्रांचे देणे म्हणजे आमचे सर्वस्व आहे. मृगाने शेती पिकते, तर हस्त मोती पिकवते. पण समुद्रामधल्या मोत्यांपेक्षा जमिनीवरचे गव्हातांदळाचे व ज्वारी बाजरीचे दाणेदार मोती जास्त मौल्यवान आहेत. म्हणून तर बळीराजा महत्त्वाचा आहे. पण दुर्दैवाने तो 'राजा' होण्यापेक्षा त्याचा 'बळी' होत आहे. आणि चैत्रप्रतिपदेला नव्या वर्षात स्वागत करायचं असेल तर 'शेतं पिकली मोत्यावाणी' म्हणून अश्विनातली बळीप्रतिपदा लई जोरात साजरी व्हाया होवी ! वर्षादेवी तुमची ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सफळ संपूर्ण.

समारोपाला परत आठवतात कविवर्य निकुंभांच्याच ओळी -
''वसंत वसंत म्हणून तेव्हा कलाविकासाचा केला बडिवार
जीवनकलेची प्रचीती मात्र तुझ्या रुपातून लाभते आज ।।
येई वर्षादेवी !''

- **मुकुंद गोविंद सराफ,** विलेपार्ले (पू.) मुंबई
दूरध्वनी - ०२२-२६१५०२४८

## 'मन वढाय वढाय....'

मनाची सुदृढता ही विचारांच्या बैठकीवर बसलेली असते. विचारांच्या परिपक्वतेवर पोसलेली असते आणि विचार हे आपल्या मनाच्या ठेवणीवर अवलंबून असतात. जेवढं आपलं मन सुदृढ, स्वच्छ व स्थिर असेल तेवढे आपले विचार प्रगल्भ, विवेकी व सकारात्मक असतील. मनाची ठेवण ही संस्कार, आजुबाजूचे, घरातील, शाळेतील, कामकाजाच्या ठिकाणचे वातावरण यावर अवलंबून असते. त्याचप्रमाणे आहार, वाचन व शारीरिक संपन्नतेवर सुद्धा अवलंबून असते.

ज्याप्रमाणे आपण आपल्या शरीराची बाह्यत: देखभाल करतो; म्हणजे आंघोळ, कपडे. त्या आंघोळीसाठी तऱ्हेतऱ्हेचे साबण, शांपू, पावडरी, क्रीम्स् वगैरे. या सर्व उपचारांनी, कपड्यांनी आपले शरीर आपण सजवतो, तद्वत आपले मन निकोप राहण्यासाठी सद्विचार-सदाचार, सत्संगती अशा मनाच्या रंगरंगोटीच्या उपचारांची गरज असते. म्हणून चांगले ऐकणे, पहाणे, बोलणे हे सोपे उपचार आहेत व तेच खरे मनाचे टॉनिक आहे.

थोडक्यात मनाच्या सशक्ततेसाठी सद्विचार, सत्संगती, चांगले वाचन या प्रसाधनांची गरज आहे. म्हणूनच म्हटले आहे 'सुसंगती सदा घडो, सृजनवाक्य कानी पडो '

परंतु मन ही अशी चीज आहे की काही विचारू नका. मनाला वारु म्हणजे घोडा व वाऱ्याची उपमा दिली आहे. विचार करता-करता मन हे वारूपुढे व वाऱ्यापेक्षाही पुढे धावते. मनात जसे चांगले तसे वाईट सुद्धा विचार येतात.

आपला परीक्षेचा निकाल आपण पास होणार ही खात्री असताना सुद्धा नापास होण्याच्या भीतीने आपण खचून जातो. घरातील व्यक्ती बाहेरून वेळेवर घरी परतली नाही तर व काही अफवा बाहेर पसरलेली असली तर नको नको ते विचार मनात घोंगावतात. म्हणून म्हटलंय 'मन चिंती ते वैरी न चिंती.'

बहिणाबाईंची एक ओवी आठवतेय. यावरून 'मन वढाय वढाय' म्हणजे मन हे जिकडे जायचं तिकडे ओढून नेलं जातं. त्याला लगाम घालणं कठीण.

'मनाचिये गुंती....' म्हणतात ना केसातला गुंता सोडवणं सोपं. परंतु मनाच्या गुंत्याला कुठचा कंगवा आणणार ?

असे हे आपले मन त्याचे रसायन काही वेगळेच आहे. त्याचे मनाने, मनातून, मनापासून मनन करायला पाहिजे. त्यासाठी समर्थ रामदास स्वामींनी एक मोठी टॉनिकची बाटली सर्वांसाठी बनवून ठेवली आहे. टॉनिकचे नाव आहे 'मनाचे श्लोक.'

- **श्रीमती गिरीजा र.पागनीस,** दादर, मुंबई
फोन - ०२२-२४४५५२७४

# दुर्दैवी बहीण

स्टेट बँकेतील नोकरीमध्ये माझा अकरा शाखांशी संबंध आला. त्यापैकी तासगाव शाखा तिच्या आगळ्या वेगळ्या वैशिष्ट्यांमुळे कायम लक्षात राहिली आहे. मी पाटण शाखेत असतानाच तासगाव येथील युनियन स्ट्राँग आहे असे ऐकले होते. योगायोगाने पाटणहून माझी बदली तासगाव येथे झाली. शाखेमध्ये वातावरण फार छान होते. समवयस्क सहकारी बरेच होते. त्यामध्ये डबल इनिशिअल्सचे (उदा.जीजी, पीपी, एसएस, डीडी, वगैरे) बरेच होते. सहकाऱ्यांमध्ये आपुलकी जिव्हाळा असल्याने आम्ही एकमेकांना इनिशिअल्सने हाका मारत असू. सुखदु:खाच्या कोणत्याही प्रसंगी सर्व स्टाफ तेथे धाव घेत असे. यामुळेच तासगाव शाखा सोडून मला सत्तावीस वर्षे झाली तरी त्यावेळच्या सहकाऱ्यांशी माझे अजूनही जिव्हाळ्याचे संबंध व येणेजाणे आहे. मी तासगाव शाखेत असताना एक हृदयद्रावक घटना घडली. ती सारांशरूपाने सादर करीत आहे.

तासगाव शाखेमध्ये मिरजजवळील बेडग येथील लिंबिके नावाचा क्लार्क होता. हा हसतमुख, मनमिळाऊ स्वभावाचा आणि अविवाहित होता. शाखेमध्ये சிகிமிமிஙி परीक्षेला बसण्याचा उत्साह होता व अभ्यासाचे वातावरण होते. लिंबिकेपण इतरांसोबत अभ्यास करायचा. साधारण १९७९ ची दिवाळी असावी. लिंबिके भाऊबीजेसाठी आपल्या गावापासून जवळच रहात असलेल्या बहिणीकडे गेला. बहिणीच्या घरी जेवण, ओवाळणे हा कार्यक्रम व्यवस्थित झाला. नंतर लिंबिके आपल्या गावी परत निघाला. रस्त्यामध्ये अकस्मात एक कुत्रे त्याच्या अंगावर धावून आले व चावा घेऊन पळून गेले. क्षणार्धात ही घटना घडून गेली. दुसरे दिवशी सुटी असल्याने तो आपल्या गावी गेला. इकडे बहिणीच्या गावी चावलेले कुत्रे मरून पडले. ताबडतो बहिणीने एक माणूस बेडगला पाठवून भावाला ही हकिकत कळवली.लिंबिके तासगावला आला व लगेच तासगावच्या आरोग्यकेंद्रात जाऊन त्याने घडलेली घटना सांगितली. तेथील प्रमुख डॉक्टरीणबाई त्याच्या ओळखीच्या होत्या. त्यांनी ताबडतोब पोटावर घ्यायच्या चौदा इंजेक्शनचा कोर्स सुरू केला. रोज एक याप्रमाणे चौदा दिवस लिंबिकेने इंजेक्शन्स घेतली. धोका टळला असे सर्वांना वाटले. कुत्रे चावल्यानंतर तिसऱ्या दिवशी इंजेक्शन्स सुरू झाली व मध्ये एक दिवसाचा खंड पडला. या गोष्टीचे गांभीर्य कोणाच्याच लक्षात आले नाही.

लिंबिकेचे दैनंदिन व्यवहार नेहमीप्रमाणे सुरू झाले. बँकेतील आमचे दिवस हसतखेळत मजेत चालले होते. पावसाळा आला. लिंबिके नेहमीप्रमाणे शनिवारी गावी गेला. घरची शेती होती. रविवारी दुपारी रानात गेला. पावसाची सर आली. जवळ आडोसा नव्हता. अर्ध्या पाऊण तासात संपूर्ण भिजून गेला. तरूण रक्त. लिंबिकेला भिजल्याचे काहीच वाटले नाही. तो रात्री मुक्कामाला तासगावात आला. रात्रीत काहीतरी फरक झाला. सकाळपासून पाण्यात कुत्री दिसतात म्हणू लागला. तरीही नेहमीप्रमाणे बँकेत आला. स्टाफला हे समजताच त्याला लगेच दवाखान्यात नेले. तेथे तपासणी करून डॉक्टरनी ताबडतोब सांगली सिव्हिल रूग्णालयात न्यायचे ठरवले. हॉस्पिटल्याच्या गाडीतून न्यायचे ठरले. डॉक्टरीणबाई स्वत: बरोबर येणार होत्या. आम्ही चार-पाच सहकारीपण गाडीतून निघालो. तासगावातून आम्हाला निघायला चार वाजून गेले होते. गाडीत लिंबिके माझ्यासमोरच बसला. सुरुवातीस तो थोडेसे बोलायचा प्रयत्न करत होता. परंतु हळूहळू त्याची स्थिती बिघडत गेली. त्याचे डोळे कुत्र्याच्या डोळ्यासारखे लकाकू लागले. नाकाने श्वास घेणे कठीण होऊ लागले. तो वारंवार थुंकू लागला. सांगलीत पोचेपर्यंत त्याचे बोलणे पूर्ण बंद झाले. तोंडावाटे श्वास चालू होता. जीभ बाहेर व नजर अस्थिर बनली होती. गाडी हॉस्पिटलचे आवारात आली. डॉक्टरीणबाई चटकन आत गेल्या. त्यांनी हॉस्पिटलचे प्राथमिक सोपस्कार पार पाडले. आम्ही लिंबिकेला आधार देत आत नेले. नर्सेस व हॉस्पिटलचा इतर स्टाफ आमच्याकडे विचित्र नजरेने पहात होता. समोर पिंजऱ्यासारखी खोली होती त्या खोलीत लिंबिकेला आम्ही नेताच नर्सने ''सोडा त्यांना आणि तुम्ही बाहेर जा'' असे सांगितले. आम्ही बाहेर येताच लिंबिकेला साखळदंडात बंदिस्त केले गेले. आम्हाला नर्सने 'हा रेबीजचा पेशंट आहे केव्हाही हिंसक होऊ शकतो' असे सांगितले. त्यावेळी आम्हाला त्यांच्या विचित्र नजरांचा उलगडा झाला. लिंबिकेला धरून नेताना आम्ही नकळत केवढा धोका पत्करला याच्या कल्पनेने अंगावर शहारा आला जीवनमरणाच्या सीमेवर घुटमळणाऱ्या लिंबिकेचे शेवटचे दर्शन घेऊन आम्ही तासगावला परत गेलो.

आम्ही तेथे असतानाच आमचे शाखाधिकारी दैनीसाहेब व इतर स्टाफ आला. लिंबिकेची परिस्थिती आता पूर्णपणे हाताबाहेर गेली होती. तो काहीही बोलण्याच्या वा कोणालाही ओळखण्याच्या स्थितीत नव्हता. त्यामुळे त्याची मृत्युपूर्व जबानी वा शेवटची इच्छा जाणून घेणे डॉक्टरांना शक्य झाले नाही. त्याला वाचवण्याचा कोणताही डॉक्टरी उपाय नसल्याने त्याचा रात्री करूण अंत झाला. रात्रीच मृतदेह त्याच्या गावी नेण्यात आला. सकाळी अंत्यविधीस सारा गाव व तासगाव शाखेचा बहुसंख्य स्टाफ हजर होता. लिंबिके हा गरीब घरातूनच आला होता. लग्न झाले नव्हते. एकही विमा पॉलिसी काढली नव्हती. त्याचा भाऊ शेती करत होता. त्यालाच अनुकंपा तत्त्वावर शिपाई पदावर घेण्याचे ठरवले. त्याप्रमाणे नंतर त्याला बँकेने नोकरीत घेतले. ॲवार्ड स्टाफ युनियन तासगाव युनिटने लिंबिकेच्यासाठी अनेक शाखांना आर्थिक मदतीचे आवाहन केले. त्या काळात पाच हजार रुपयांच्या वर रक्कम जमा झाली व ही मदत त्याच्या कुटुंबियांना देण्यात आली.

सांगली सिव्हिल हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी, लिंबिकेबरोबर तासगावहून जे लोक गाडीतून आले त्यांनी व लिंबिकेच्या संपर्कात त्यादिवशी जे आले त्यांनी ॲंटिरेबीज इंजेक्शन्स घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यामुळे दुसऱ्याच दिवसापासून शाखेतील आठ-नऊ स्टाफ व तासगाव आरोग्य केंद्राच्या डॉक्टरीण यांनी इंजेक्शन्स घेणे सुरू केले. आम्ही स्टाफ मेंबर्स इंजेक्शन्स घ्यायला बरोबरच जात होतो. पोटातील ही इंजेक्शन्स खूपच दुखायची. सुरूवातीला

पाच-सहा दिवस आम्ही हा-हू करत बँकेत कामे केली. त्यानंतर हेड ऑफीसने इंजेक्शन्स घेणाऱ्यांना स्पेशल लिव्ह मंजूर केली. त्याचप्रमाणे सांगली शाखेतून चार-पाच स्टाफ डेप्युटेशनवर पाठवला.

अशा रीतीने तासगाव शाखेतील अविस्मरणीय दुर्दैवी पर्व समाप्त झाले. हा सारा प्रसंग आम्हा सर्वांच्या हृदयावर कोरला गेला आहे. लिंबिकेला भाऊबीजेच्या दिवशी कुत्रे चावणे व दुर्दैवी योगायोगाने राखी पौर्णिमेच्या दिवशी त्याचे निधन होणे या गोष्टीने बिचाऱ्या बहिणीच्या काळजाला किती यातना झाल्या असतील या कल्पनेनेच जीव कासावीत होतो.

- गजानन अराणके, वारजे, पुणे-५८
भ्रमणध्वनी - ९८८१०६१४१३

## सेवानिवृत्त सेवाभावी मी !

नवीन पुस्तक घरात आले की,
चांगले कव्हर घालतो
ही माझी साहित्य सेवा !
गाण्याच्या मैफलींना आवर्जून जातो
तबला पेटी तंबोरा हलवण्यात मदत करतो,
ही माझी संगीत सेवा !
१५ ऑगस्ट व २६ जानेवारीला
नेमाने झेंडावंदन करतो व
'भारत माता की जय' मनापासून ओरडतो
ही माझी देशसेवा !
गणेशोत्सव व नवरात्रोत्सवांना
न चुकता वर्गणी देतो,
मतदानाच्या दिवशी मतदान करतो
ही माझी समाजसेवा !
८५०-७५-१५०० च्या ग्रेडमध्ये
पत्नीसह दोन मुलांचा सुखी संसार करतो
नी आई वडिलांना भेटायला,
दर दिवाळीला वृद्धाश्रमात जातो
ही माझी कुटुंब सेवा !
आता मात्र - डॉक्टरने नेमून दिलेले पथ्य पाळतो
वेळेवर औषधे घेऊन, सर्व चाचण्या
नियमित करून घेतो
ही मात्र माझी स्वयंसेवा !

**- विजय देशपांडे,** मुंबई
भ्रमणध्वनी - ९८७०३५३२४४

## साठवणीतील एक आठवण

माझी आत्या वय वर्षे अंदाजे ७०/७५. पतीच्या निधनानंतर भोर येथे रहात असे. तिच्याबरोबर तिचे धाकटे दीर दोघेच एकत्र रहात होते. पण प्रत्येकाचा संसार वेगळा. धाकट्या दिराचे सोन्या-चांदीचे छोटेसेच दुकान पण ख्याती भरपूर. त्यामुळे आसपासच्या खेड्यात प्रसिद्ध.

पतीनिधनानंतर कोणाचीही लाचारी पत्करायची नाही, कोणावरही अवलंबून रहावयाचे नाही अशी तिची जिद्द. जोपर्यंत आपले हात पाय चांगले चालताहेत तोपर्यंत स्वकष्टानेच पुढील जीवन जगण्याचा तिचा ठाम निश्चय होता. त्यामुळेच जवळच्याच एका ब्राम्हण कुटुंबात ती स्वयंपाकपाणी, धुणी भांडी, दळणाची कामे करीत असे. दीर-भावजय यांच्याकडे हात न पसरता, स्वाभिमानाने ती एकटेपणानेच जीवन जगली.

भोर येथे किंवा तेथील आसपासच्या भागात काही कार्यक्रम असला आम्ही तेथे गेल्यावर आवर्जून आत्याला भेटत असू. भेट झाल्यानंतर त्यांना अतिशय आनंद होत असे. मग त्यांच्या ऐपतीप्रमाणे चहा, कॉफी, लिंबू सरबत देऊन मोठ्या उत्साहाने आमचे स्वागत होत असे. एकदा असाच प्रसंग आला. माझ्या पुतण्याचा साखरपुडा खुद्द भोर गावातच होता. तो कार्यक्रम उरकून मी आणि माझा थोरला मुलगा आत्याच्या घरी गेलो. अंधारी खोली. दरवाजातून आलेला एकच उजेडाचा थोडा झरोका. केवळ आवाजावरून तिने दत्ताऽ म्हणून हाक मारली. मी होकार देऊन आत गेलो. तिने आणलेली द्राक्षे चाखून माखून ती खात होती. त्यातील दोन चार द्राक्षे तिने मला दिली. खा म्हणाली. द्राक्षे गोड होती. खाऊन समाधान वाटले. त्याच क्षणी मला प्रभु रामचंद्र आणि शबरीच्या बोरांची आठवण आली. आत्याने द्राक्षांनी केलेल्या स्वागतामागे वात्सल्य व प्रेमाची भावना होती. मायेने भरलेले तिचे डोळे पाहून आमचेही डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. आम्ही बरोबर नेलेली साडी चोळी आत्याला देऊन आदराने तिला नमस्कार केला. 'आत्याऽ ! येतो गं !' असं म्हणून मोठ्या जड अंत:करणाने आत्याचा निरोप घेतला. आत्याने जगाचा निरोप घेऊन एक वर्ष झाले. परंतु वरील प्रसंगाची अजूनही नुसती आठवण झाली तरी अंत:करण भरून येते.

- दत्तात्रय क्षीरसागर, पुणे ६.
दूरध्वनी -०२०- २६६८६१५५

## अभिनंदनीय

आपले नागपूर येथील ज्येष्ठ सदस्य श्री.एन्.जी.मोरे यांची नात कु.अदिती किशोर कोकजे ही नागपूर विद्यापीठाच्या यंदाच्या ''बॅचलर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी'' या परीक्षेमध्ये पहिल्या श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. या तिच्या नेत्रदीपक यशाबद्दल असोसिएशनतर्फे तिचे हार्दिक अभिनंदन !

- सेक्रेटरी

# दुबई - वाळवंटातील नंदनवन

माझा मुलगा अतुल हा त्याच्या कुटुंबासमवेत दुबई या संयुक्त अरब राष्ट्रामध्ये नोकरीनिमित्त रहात असल्यामुळे पहाता येईल या उद्देशाने आम्ही दोघेही दुबईला गेलो होतो. डिसें. ०८ ते मार्च ०९ असे तीन महिने आमचे दुबईत वास्तव्य होते.

संयुक्त अरब अमिरातीच्या सात सदस्य देशापैकी दुबई हे एक सिटी स्टेट आहे. दुबई, अबुधाबी, शारजाह, अजमान, उम् अल् कैवान, रस अल खैमान आणि फुजारा अशी संलग्न राज्ये आहेत. राजधानी अबुधाबी येथे असून हिजहायनेस शेख मोहम्मद बीन रशिद अल मक्तुम हे दुबईचे पंतप्रधान व संयुक्त अमिरातीचे उपाध्यक्ष आहेत. अत्यंक कठोर प्रशासन आणि पराकोटीची कार्यक्षमता तसेच अरबांची जिद्द यामुळे संयुक्त अमिरात आणि दुबई यांची सर्वांगीण प्रगती झाली आहे. सामाईक चलन UAE डिरहॅम आणि FILS म्हणजे सुटी नाणी. सध्या भारतीय रूपये १३.५० बरोबर एक डिरहॅम असा विनिमय दर आहे. दुबईमध्ये अरेबिक भाषेबरोबर हिंदी, तेलगु, इंग्रजी, मल्याळी, बंगाली अशा विविध भाषा कानावर पडत राहिल्याने भारताच्याच एखाद्या कॉस्मॉपॉलिटन शहरात आहोत असा भास होतो. एकूण खनिज तेल उत्पादनापैकी ७५% उत्पन्न अबुधाबी येथून मिळते तरीही दुबई हे जगातील सर्वात उत्तम आणि अत्याधुनिक शहर बनविण्याचा तेथील प्रशासनाचा निर्धार आहे. त्यादृष्टीनेच त्यांनी पाऊले उचलल्याने आजही येथे जगातील उंच असे ''बर्ज अल अरब'' हे सप्ततारांकित हॉटेल, बुर्ज दुबई ही १६५ मजली इमारत, अतिविशाल मॉल्स तसेच मशिदींच्या उंच इमारती, समुद्रात भर टाकून बनविलेले 'हॉटेल अटलांटिस', प्रशस्त रुंद असे सहा किंवा आठ पदरी रस्ते यांचे येथील प्रमाण हे जगातील कोणत्याही भागापेक्षा जास्त आणि आश्चर्यचकित करणारे आहे. हॉटेल्स आणि प्रचंड मोठ्या इमारती या तर स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने नावाजलेल्या आहेत. बऱ्याच इमारतींवर हेलिपॅडस् बांधून हेलिकॉप्टर्स उतरण्याची सोय केलेली आहे.

दुबईच्या वास्तव्यात आम्हाला या वाळवंटाच्या नंदनवनातील अनेक अविस्मरणीय पैलू पहावयास मिळाले. दुबईमधील 'सिटी सेंटर' हा भाग पहायला गेलो. इथे प्रचंड मोठ्या आकाराची मॉल्स आहेत. अगदी साध्या स्क्रूपासून मोठ्या गाडीपर्यंतच्या पाहिजे त्या वस्तू या मॉल्समधून उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या प्रचंड मॉल्समधून फिरताना पाय दुखायला लागतात. त्यामुळेच प्रत्येक ठिकाणी करमणुकीची आणि खेळण्याची साधने आणि खाण्यापिण्याच्या सोयी उपलब्ध असतात.

'शारजाह नॅशनल गार्डन' ही एवढी प्रचंड बाग आहे की तेथे फिरण्यासाठी चक्क रेल्वेच वापरली आहे. रेल्वेतून संपूर्ण बागेला आरामात फेरी मारताना टवटवीत फुलांचे ताटवे, झाडे, सुंदर हिरवळ पाहून आपला आनंद द्विगुणित होतो. छोट्यांसाठी खेळायला वेगवेगळी क्रीडांगणे असल्यामुळे खेळण्यातसुद्धा विविधता येते. अजनान येथील समुद्र किनाऱ्यावर इतके स्वच्छ आणि निळेशार पाणी असलेला समुद्र दुसरीकडे सहसा पहायला मिळत नाही. याच भागात 'बर्ज अल् अरब' ही जगातील सर्वात उंच इमारत आहे. फ्लड लाइटस् द्वारे त्यावर सतत बदलणारे विविध रंगी प्रखर प्रकाशझोत पाहून मन प्रसन्न होते. याशिवाय अल् जझिरा पार्क, शारजाह डेझर्ट पार्क, ग्लोबल व्हिलेज, क्रीक पार्क, ॲलन झू असे विविध आणि एकदा तरी पहावेच असे पार्क आहेत. सर्वच बागा सुनियोजित आहे. पावसाचे प्रमाण अल्प असले तरी या बागातील फुले, तरुवर, वेली अगदी टवटवीत असतात. दुबईसारख्या छोट्याशा देशाने इतकी उत्तुंग प्रगती केल्याचे पाहून मन थक्क होते. नैसर्गिक अडचणींवर मात करून परकीय तज्ज्ञांना हाताशी धरून वाळवंटात हे नंदनवनच फुलविलेले आहे. रात्रीच्या वेळी विमान तळावर उतरताना संपूर्ण दुबईची हवाई रोषणाई दाखविणारे मनोरम दृष्य पहायला मिळते.

प्रचंड आकाराची मॉल्स हा तर वेगळाच विषय ! सहारा मॉल, ड्रॅगन मॉल आणि अशा प्रकारची अनेक मॉल्स आहेत. एवढी मॉल्स चालतात तरी कशी ? असा सामान्य माणसाला प्रश्न पडावा. वस्तूखरेदीसाठी खिसा मोकळा करा म्हणण्यापेक्षा क्रेडिट कार्ड तयार ठेवा असे सांगणेच सयुक्तिक होईल. शेवटी शेवटी तर ही प्रचंड मॉल्स आणि तेच तेच प्रकार पाहून कंटाळवाणे होऊ नये यासाठी प्रायोजकांनी तेथे विविधता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुबई मॉलमध्ये पाण्याची प्रचंड भिंतच दिसते. परंतु भिंतीपुढे पाण्याचा थेंब किंवा ओल असा प्रकार नसतो प्रसिद्ध கிஹீவுணக்ஷீவீவுனீஜிவுஸீஸீமீரீ येथेच पहायला मिळते टनेलमधून आजूबाजूला दिसणाऱ्या विविध प्रकारच्या, विविध आकाराच्या आणि विविध रंगाच्या माशांचे निरीक्षण करायचे. सील मासा तसेच पेंग्वीन पक्षी तर त्यांच्या नैसर्गिक वातावरणात ठेवलेले आहेत. त्यांच्यासाठी बर्फाचे सरोवरच तयार केलेले आहे. ३२०० प्रकारचे मासे या टनेलमध्ये आहेत अशी जाहिरातच केलेली आहे. 'ग्लोबल व्हिलेज' हे प्रतिवर्षी नोव्हें. ते फेब्रु. पर्यंत उघडे असते. ३० ते ३५ देशांच्या वैशिष्ट्यांची या ठिकाणी जाहिरात करण्यात येते. 'शारजाह डेझर्ट ' मध्ये वाळवंटातील थरारक अनुभव देणारी सफर घडवितात. येथेच नॅचरल हिस्टरी म्युझियम'' या संस्थेत वनस्पतींवर केलेले विज्ञानाधिष्ठित प्रयोग अभ्यासता येतात. 'अटलांटिस' हे जगातील द्वितीय क्रमांकाचे 'सेव्हन स्टार' हॉटेल समुद्रात भर टाकून बांधलेले आहे. वैशिष्ट्य असे की पाम झाडाच्या आकाराप्रमाणे यातील इमारती आहे आणि टोकाला अटलांटिस हॉटेलची मुख्य इमारत आहे. 'ॲलन'' या अरब संस्थानामध्ये डोंगराच्या पायथ्याशी प्राणीसंग्रहालयामध्ये 'बर्ड शो' आणि दुबई येथील 'क्रीक पार्क' येथे डॉल्फीन माशांचे मनोरंजक खेळ पहायला मिळतात. 'स्किदुबई ' हे मॉल ऑफ इमिराटस् येथे - ०४ तापमान करून स्केटिंगसारखे क्रीडांगण आणि बर्फशिल्पे केलेली आहेत. त्याशिवाय मेट्रोट्रेनचे काम दुबईमध्ये चालू आहे. ०९.०९.२००९ रोजी त्याचे उद्घाटन होणार आहे. यामुळे दुबईच्या प्रगतीमध्ये आणखी एक मानाचा तुरा खोवला जाईल.

दुबईमधील एवढी प्रेक्षणीय स्थळे पाहताना माझा नातू अथर्व हा बरोबर असायचाच. तो तेथेच इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आहे. त्याच्या शाळेत जाण्याचा योग आला. कराटे स्पर्धेमध्ये त्याला बरीच पारितोषिके मिळाली होती. एवढासा मुलगा, समुद्रापल्याड जाऊन इतके उत्तुंग यश मिळवितो हे पाहून त्याचा सार्थ अभिमान वाटला.

असे हे दुबई शहर ! तीन महिन्यांच्या अवधीत किती पाहू , किती अनुभव घेऊ, असे झाले. अगदी लहान मुलांची जिज्ञासा असते त्याप्रमाणे आम्हाला वाटत होते. दुबईला वाळवंटातील नंदनवन हीच एक उपमा योग्य आहे. दुबईतील सौंदर्यस्थळांचा निखळ अनुभव घ्यायला तरी प्रत्येकाने दुबईला भेट द्यावीच असे मनापासून वाटते.

**- अरविंद काळे,** निशांत सोसा., पुणे ३७

भ्रमणध्वनी - ९८२२३३९५५२

## आई - एक प्रश्नचिन्ह ?

(सर्वसाधारणपणे आईची महती गाणारी काव्ये भरपूर आहेत. माता चांगल्या आहेत तशा वाईटही आहेत. टक्केवारीत जरी त्यांचं प्रमाण कमी असलं तरी तशा माता आहेत ही वस्तुस्थिती आहे. पारंपारिक कल्पनेला धक्का देणारी आई विषयीची दाहक वास्तवता चित्रित करणारी ही कविता सादर केली आहे. - संपादक)

प्रेमस्वरुप आई, वात्सल्यसिंधु आई
आई थोर तुझे उपकार इत्यादी, इत्यादी
अनाथाश्रमातल्या आम्ही सर्व मुली
जेव्हा वाचतो, ऐकतो वरील ओळी
आठ्या उमटतात आमच्या भाळी
गरीबीमुळे मुलांना विकणारी
केवळ मुलगी म्हणून अर्भकाला टाकणारी
गर्दीच्या ठिकाणी हात सोडून पळणारी
अनौरस संतती म्हणून कचरा कुंडीत फेकणारी
गुप्तधनासाठी निर्दयपणे बळी देणारी
स्वत:च्या अय्याशीसाठी ठार मारणारी
आई, आई असू शकते ?
ती फक्त जन्मदात्री .....
''आई '' शब्दाचा अपमान करणारी
अशी कशी ही संतापी, क्रूर, कठोर आई ?
'आई ' शब्दाविषयीचा उबग, उदासीनता
शिवबाची आई, श्यामची आई....
आम्हाला भेटेल का ?
प्रश्न घोंगावतो मनाला उसवतो
खरोखरच आई एक प्रश्नचिन्ह !
एक प्रश्नचिन्ह !! एक प्रश्नचिन्ह !!!

**- अरूण भट, बदलापूर (पूर्व)**

भ्रमणध्वनी - ९३२४५५८०५१

## अभिनंदनीय

१) आपले यवतमाळ येथील एक सभासद श्री.दत्तात्रय शंकर गोखले यांची नात कु.जान्हवी अमोल गोखले हिने माध्यमिक शालांत परीक्षा २००९ मध्ये ९१.३८% मार्कस् मिळवून नेत्रदीपक यश मिळवले याबद्दल तिचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन !

२) आपले वर्धा येथील ज्येष्ठ सदस्य श्री.मनोहर ढोबळे ह्यांचा नातू चि.शुभम् (इ.८वी) हा 'गणित प्रज्ञाशोध' परिक्षेत वर्धा जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तसेच त्याने "8th National Cyber Olimpiad" या स्पर्धेत वर्धा नगरात प्रथम क्रमांक आणि 'सातवा वर्ग स्कॉलरशिप' परिक्षेत वर्धा जिल्ह्यातून पांचवा क्रमांक पटकावला. शुभम्च्या या घवघवीत यशाबद्दल त्याचे आपल्या असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन !

वरील दोनही कुमारांना त्यांच्या पुढील आयुष्यातील यशस्वी वाटचालींसाठी शुभेच्छा.

***- सेक्रेटरी***


## सेवानिवृत्तांनो, कृपया इकडे लक्ष द्या

साठीनंतर आपण आरोग्याची विशेष काळजी घेतो त्यासाठी रक्त, लघवी, हृदय, कोलेस्ट्रॉल याची चाचणी करून घेतोच. पण आपण कधी आपल्या शरीराचं विश्लेषण (ஙிஷ்டீஹ் கிஸீணீறீஹ்உவீஉ) केलं आहे का ? हे जर केलं नसेल तर ताबडतोब खालील पत्त्यावर या. विशेष म्हणजे ही तपासणी व सल्ला दोन्हीही अगदी मोफत. तपासणीला ५ मिनिटे व सल्ल्यासाठी १० मिनिटे अशी फक्त १५ मिनिटे वेगळी काढा. वेळ सकाळी ७ ते १०. विशेष सूचना : येताना रिकाम्या पोटी या. सोबत आपले शेजारी, नातेवाईक आणले तरी चालतील.

**Neutrino - The Nutrition Club**

**SIPL Digital Planet**

२१४६ सुखदा अपार्टमेंट, हॉटेल कावेरी समोर, ना.सी.फडके सभागृह चौकाजवळ, पुणे ४११०३०

**अधिक माहितीसाठी संपर्क करा.**

*** शरद महाबळ : ९३७४२८३२२**

*** मंदार फाटक : ९३७०३२४२५१**

(Advt.)

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

# प्रतिक्रिया

This is with regard to your editorial of May 2009 issue. While I may not know chaste Marathi, what I understood from it was not quite amusing.

It is the tendency of quite many persons who never appreciate the laudable work done by the self-less clan. The persons who criticise and always expect more than what they actually deserve, are those who never worked sincerely while in the Bank (now they claim that they worked very hard when they were young), while away from their banking time in extra (outside the bank ) curricular activities. Such people should ponder and ask themselves that how much they worked for the Bank/organization and how much they got from it. We should not forget that today our social standing and financial strength is not because of anything else, but due to our mighty organization.

Please do not get disheartened for the obscure comments passed by miniscule minority and be assured that majority lauds the commendable work done by the selfless and devoted persons who run the Association and do other social work for the welfare of the members.

- **Manohar H.Belani,**
Mumbai 400081

********

'संवाद' च्या जुलै २००९ च्या अंकातील श्री.क्रांतिसेन आठवले यांचे संपादकीय खूप काही सांगून गेले. निर्सगाच्या लहरीपणाची व मनुष्यांच्या भक्तिभावाची सांगड घालून ज्येष्ठांच्या मनांमधे शिरून परत देशाच्या सद्यपरिस्थितीवर त्यांनी आणून सोडले. तसेच श्री.दांडेकर साहेबांनी (Pensioner's Way To A Happy Life) वरील लेख फारच माहितीपूर्वक आहे. सर्व सभासदांनी जुलै २००९ चा संवादचा अंक आपल्या घरतील संबंधितांना वाचावयास सांगावे व सभासदांनी अंक आपल्या संग्रही जपून ठेवावा.

- वसंत मो. प्रभुदेसाई, पुणे

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.